can imagine how beautiful and massive this fort would have been in the past. It was a beautiful sunny afternoon which gave me the chance to capture some photos with my camera. When you are traveling with a group of friends with a common interest, the journey becomes more interesting and memorable.

My all friends are nature lovers and travel enthusiasts like me and we all try to find something uncommon in common places. We reached the end of the fort by walk and saw a snake that looked like a rock python by the skin but small enough to call a python. It was my first encounter with a wild snake out of any captivity center or a zoo. All though only its tail was visible to me, my happiness and curiosity reached its peak but some tourist made a "hiss" sound and threw stones at it which made the snake enter a small hole of the wall. I was not in the mood to give up because I wanted to see how a wild snake looks. I went to the other side of the wall to see where that snake went and what I saw was unbelievable for me. The same snake which disappeared behind the wall didn't go in the hole because of the stones, it was actually behind a rat. It attacked the rat and wrapped it up with its body and tried to swallow it but as there were many people around the snake, it regurgitated the rat and disappeared in the hole leaving the dead rat behind it.

This was like a double bonus for me. I captured as many photos and videos as I can and I was excited to show it to my friends and parents. After returning home, I uploaded one of my photos in one of the Facebook groups managed by wildlife enthusiasts. Within some time, I got a message from one of the wildlife researcher Krishna Khan who is a specialist in reptile research and he had discovered many species all over India. He contacted me and asked me about the location of the photos, do I have more videos or photos so that he can research it. After 3 years of research and a long wait, the research was approved by Kansas University and published in "IRCF REPTILES & AMPHIBIANS" Journal. This was the first

**Occurrence of the Arrow-headed Trinket Snake (*Coelognathus helena nigriangularis*) in the Melghat Tiger Reserve: A Second Locality Record for Maharashtra State, India**

Link for IRCF REPTILES & AMPHIBIANS Journal :
https://www.researchgate.net/publication/334749019 Occurrence of the Arrow-headed Trinket Snake Coelognathus helena nigriangularis in the Melghat Tiger Reserve A Second Locality Record for Maharashtra State India

■ ■ ■

7

# पर्यावरण पुरक कोळी

**प्रा.डॉ. मिलींद वि. शिरभाते**
प्राणीशास्त्र विभाग,
शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला

**प्रा.डॉ. अमृता मि. शिरभाते**
प्राणीशास्त्र विभाग,
महात्मा फुले महाविद्यालय, अकोला



निसर्गामध्ये प्रत्येक सजीव व निर्जीव घटकाला एक अनन्य साधारण महत्व आहे. ज्याचे अस्तीत्व पर्यावरणा-चा होणार ऱ्हास टाळण्याकरीता महत्वाचे ठरु शकते. असाच या पर्यावरणातील एक घटक म्हणजे कोळी (स्पायडर) कोळी हा पाठीचा कणा नसलेल्या (Invertebrate) या ग्रुपच्या Arthropda या फायलम मधील Arachnida क्लास चा एक प्राणी आहे. आपण सर्वांच्या ओळखीचा असलेला हा स्पायडर. जगामध्ये कोळयांच्या एकूण 118 फॅमेली 4103 जनेरा व 47743 स्पेसीज त्यापैकी भारतामध्ये 62 फॅमिली, 449 जनेरा 1719 स्पेसीज आठ डोळे, आठ पाय, रेशमा सारखे जाळे बनविण्याकरीता असलेले Spinnerete स्पिनरेट, इतर किटक खाण्याकरीता Chelicera चेलीसीरा नर व मादी त्यांच्या लिंगावरून ओळखली जातात. नराला दोन Pedipalpi चेहऱ्याच्या भागावर असतात. त्यामध्ये शुकाणू साठवलेली असतात व मादीची ओळख पाठीखालच्या भागावर Epigyne एपीगाईन मुळे होते. ज्यामध्ये अंडाशय असतात. कोळयाची शास्त्रीय ओळख पटविण्यासाठी पेडीपाल्प व एपीगाईन चे आतील आकार व ठेवण सुक्ष्म दर्शकात पाहून ठरवली जाते. काळी विविध रंगाचे असतात. जमिनीवर, जमिनीच्या खाली छीद्र करून, झाडावर, झाडाच्या बुंध्यावर, पाने फुलावर, पाला-पाचोळयात, पाण्या शेजारी, सगळीकडेच कोळयांचे वास्तव्य असते.

कोळी मुख्यतः कुठल्या प्रकारचे किटक खातात म्हणून ते शेतकऱ्यांचे एक प्रकारे मित्र आहेत. शेतकरी आपल्या शेतात किटकांना मारण्यासाठी किटक नाशकाची फवारणी करतात व त्यामुळे प्रदुषणही होते म्हणून प्रदुषण टाळायचे असेल तर शेतकऱ्यांनी कोळयांच्या उपयोग शास्त्रीय दृष्ट्या करायला हवा. कोळी स्पिनरेट ग्रंथीमधून रेशमासारखा धागा तयार करतात. हा धागा अतिशय टणक असतो व वजनाला हलका असतो म्हणून कोळयांच्या हया धाग्यापासून जवानासाठी बुलेट प्रुफ जॅकेट बनवता येवू शकते व वाहनाचे वजन कमी करण्याच्या दृष्टीने प्लॅस्टीक किंवा लोखंडा ऐवजी हे धागा वापरल्या जाऊ शकतो. कोळयांचे रेशीम ॲन्टीबायोटीक असते. म्हणून पक्षी



आपल्या घरट्यांना आतून कोळ्यांचा रेशमाचा थर लावतात. त्यामुळे त्यांचे पिल्ले सुरक्षित राहतात. त्यांना जखम झाली तर लगेच बरी होते. सर्वच पक्षी आपल्या पिलांना कोळी खाऊ घालतात. कारण कोळयांमध्ये खूप प्रथिने असतात. मधमाशा सारख्या माशा जी मातीची घरे बनवतात. ती सुध्दा आपल्या पिल्लांना कोळी खाऊ घालतात. थोडक्यात कोळी काही प्राण्यांसाठी आवडते अन्न आहे. सर्वच कोळी डास खातात म्हणजेच ते आपले मलेरिया सारख्या आजारा पासून संरक्षण करतात. पाण्यातील डासांच्या अळया खाणारे काही कोळी घाणेरडया पाण्यातही आढळतात. थोडक्यात कोळी उडणाऱ्या डासांना तसेच पाण्यात असलेल्या त्यांच्या अळयांना सुध्दा खातात. म्हणजेच मलेरिया पासून संरक्षण करायचे असेल तर कोळी हा एक महत्वाचा प्राणी आहे. कोळयांच्या रेशमापासून गिटाराच्या तारा, हॉस्पिटलमध्ये सरजीकल धाग्यांच्या वापरामध्ये सुध्दा या रेशमाचा उपयोग होतो. कोळयांच्या रेशमापासून बनवलेले कपडे सुर्यकिरणातील यु.व्ही. रेज पासून आपले संरक्षण करतात. कोळयांच्या रेशमाचा रंग सोनेरी, हिरवा, पांढरा, तपकिरी, गुलाबी ही असू शकते. कोळयांमुळे जमिनीची पोत सुधारते. आपली जंगले त्यामुळे सुरक्षित आहेत. जमिनीवर पडलेला कचरा अनेक किटक खातात आणि नंतर हया किटकांना कोळी खातात. कोळयांची विष्ठा त्याच जमिनीवर पडते व त्यामुळे जमिनीची पोत सुधारते. म्हणूनच कोळी हा शेतकऱ्यांचा एक मित्र आहे. असे हे आपले कोळी एक निसर्गमित्र, शेतकरी मित्र व मानव मित्र आहेत व त्यांचे संरक्षण करणे ही आपली सर्वांची जबाबदारी आहे.

■ ■ ■





8

# मेळघाटच्या वनातील एक अनोखी प्रेमकथा

**प्रफुल्ल सावरकर**
उपजीवीका तज्ञ,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.



**मी** या वनाचा अनिभिज्ञ सम्राट असलेल्या वाघाच्या वनाच्या गाभा क्षेत्रात गडगा नदीचा काठी वसलेलो आहे. मी ढाकणा विश्रामगृह या नावाने प्रचलित आहे. समोरून वाहणारी गडगा नदी माझ्या सौंदर्य व माझ्या असण्याला महत्व प्राप्त करून देते. तिच्या विना माझ्या अस्तित्वाला अर्थ नाही. तीच माझ्या जवळ असणं हे माझ्या आयुष्याची परवानी आहे. मला जाणवतेय ती आहे. म्हणून माझा जन्म इथे झाला. तिच्या खळखळ वाहनाऱ्या पाण्यामुळे, त्यावर अवलंबून असणाऱ्या वन्यजीवांमुळे माझा जन्म इथे झाला, असे म्हणायला हरकत नाही. मला आज ही आठवते ते दिवस, त्या दिवसात या भागात दाट म्हणजे अगदी दाट जंगल होत. ना कुठली गाडी ना रस्ता. फक्त मी आणि मी आणि माझ्या सोबतीला ही गडगा माझयी सखी, एका प्रियेसी पेक्षा कमी नाही ती मला, कधी ही तिने माझी साथ सोडली नाही. नाही रूसली माझ्यावर पावसाळयात तर माझ्यावर भरभरून प्रेम करायची, माझ्या जवळ येऊन बोलायची, कसा आहेसं तू? मी म्हणायाचो हे गडगा, I Love You. ती म्हणायची, तुझ अस्तित्व ही नसेल तेव्हा पासून मी येथून वाहते आहे, मी तुझ्यापेक्षा वयाने मोठी आहे रे, मी म्हणायचो, असेल तू मोठी पण माझा जन्म झाल्यापासून तर मी तुलाच तर पाहतोय, तुझ्या तर सहवासात राहतोय, तुझे वाहणाऱ्या पाण्याच्या संगीता शिवाय मला निवांतपणा मिळत नाही. तुझं पावसाळयातल खळखळ वाहन तर हिवाळयात लाजत-बूजत पुढे जाणे आणि उन्हाळात तर तू माझ्यावर रूसल्यासारखी असायची शांत. तुझ्या उदरात घेतलेले अनेक सजीव-निर्जीव तापून उठलेले. सजीव तरी थोडया पाण्यात स्वतः टिकवून ठेवायाचे ग्रीष्माची वाट पाहत पण निर्जीव बिचारे दगड, गारगोटी पार तापात असणार आणि तुझ्या तर जीवाची लाही-लाही होत असेल ना गा"! या कडक तापलेल्या उन्हान, तुला काय सांगू तुझ्या सोबत माझं ही काळीज जळायचे तुला तपतांना पाहून, वणवा लागायचा माझ्या मनात, कस सांगू तुला असं वाटायचे गं गडगे, तुला माझ्या कशीत घ्यावं, माझ्या आजूबाजूंनी असलेल्या वडाच्या सावलीत मी आहे. त्यात तुला ठेवाव, खूप त्रास व्हायचा मला तुला



त्रास होताना पाहून, तरी तू कशी खंबीर सर्वांची तहान भागवनारी, सर्वांना शीतल ठेवणारी, डोळयान दिसणाऱ्या सुक्ष्म जिवापासून तर मास्यापर्यंत तर वाघाला ही आपल्या छायेछात्रेत घेणारी गडगे, मी तुला लाडाने गाडगे म्हणणार, तुझा हा उदार मतवादी स्वभाव मला खूप आवडतो आणि म्हणूनच तू मला हवी हवीशी झाली आहे. एकदा तरी बोलना ग, गडू माझ्याशी सांगना तुझं माझ्यावर प्रेम आहे म्हणून, बघणे गडगे, तु माझ्या अगदी समोरून जातेस पुढे तापीला भेटतेस आणि तिच्यात स्वतःला सामावून घेतस, कसलाच गर्व न करता, तु तुझं अस्तित्व तिच्या स्वाधीन करते आणि पुढे थेट समुद्रात विलीन होतेस. किती ग मोठं मन तुझं. स्वतःपेक्षा दुसऱ्यांना आनंद देण्यात सतत मग्न असतेस, म्हणून तुझा हा त्याग पाहून तू माझ्या हृदयात घर केले आहे. सन 1908 पासून मी तुला पाहतोय तू अशीच आहेस निरागस, निर्मळ, सतत दुसऱ्यासाठी झटणारी, त्यांच्या आनंदात स्वतःच सुखः शोधणारी, न थकता न थांबता अविरत कष्ट करून सर्वांना पाणी देणारी, जीवन देणारी, तुझा हा त्यागतच मला माझं प्रेम दिसते ग गडगे, मला कळले की, तू पार जंगलाच्या मध्य भागातून म्हणजे बेनाम संरक्षण कुटी जवळून तुझा जन्म झाला, तेथून तू समर्पणच्या भावनेने वाहयला सुरूवात केली. छोटया मोठया नाले, ओढ यांना सोबत घेऊन पुढचा प्रवास करायला लागली. या नश्वररूपी ईश्वराची प्रिय लाडकी लेक तू, सर्वांना मनाभावनेने सेवा दयायला लागलेली, असा कसा ग तुझा स्वभाव दयाळू, म्हणूनच तूच दैवत आहे. माझ, तूच माझी सखी आहेस आणि हो प्रियेसी होणार ना ग माझी, बोलना, एकदा तरी बोल तुझ्या मनातलं मत काय आहे. माझ्याबद्दल, बोलना ग प्लिज, तुला जानू म्हटलं तर चालेल का ग गडगे, सांगना ग, आये हो मेरे जिंदगी मे तुम बाहर बनके, मेरे दिल मे यू ही राहना तू प्यार प्यार बनके, राहशील ना ग. तिन्ही ऋतूमध्ये मला साथ देशील ना ग. मी तुला तेव्हा पासून बघतोय जेव्हा माझ्या उभारण्याला सुरुवात झाली, तेव्हा पासून, माझ्या उभारणीत तुझाच तर सिहांचा वाटा आहे. माझी तहान तूच तर भागवायची, माझ्या जोडणीला तुझेच तर पाणी असायचे. माझ्या पायापासून तर धडापर्यंत तूच तर मला जिवंत ठेवलय, तू जर तुझ्यातल पाणी दिले नसते तर माझं अस्तित्व ही राहिले नसते. म्हणून तू माझ्या मनात आहे. खोल गाभाऱ्यात, जरी मी तुझा जन्माचा साथीदार नसेल, पण माझ्या जन्मापासून तूच मला सोबत केले आहेस, तुझाच तर सहारा आहे. मला, आता तरी हो म्हण गा मला पण तुझ्यात सामावून घेणा प्लिज, सखे.

प्रिय विश्रामगृह,

मला कळतेय तुझ्या भावना, मी पण तुला बघतोय की तुझ्या अस्तित्वा पासून अगदी तू लहान होतास ना तेव्हापासून, तू जेथे आज उभा आहेस तिथे पूर्वी हे झाड झुडपे आनंदाने उभे होते आणि मी माझ्या उजव्या बाजूच्या भागाला उंच डोंगर तर सखल भागाला झाडें, झुडपे होती, नंतर तुझ्या जन्माला सुरुवात झाली, गोऱ्या इंग्रज लोकांनी राहण्यासाठी तुझ्या बांधणीला सुरूवात



केली, तुला माहित पण नसेल तुझा जन्मापासून मी तुझी तृषा पूर्ण करत आहे आणि अजून ही करते. मग हे काय आहे सांग बर, खूप लोक उभे करण्यात व्यस्त होते तुला आणि मी विचारात होते की, इथे काय होणार? मला पण भिती होती माझी. एका बाजूचा थोडासा वाटा तुझ्या रूपाने तयार होणार होता, पण माझा दुसऱ्या भागाला तर हे लोक धोका तर नाही पोहचवणार न" यांची सतत भीती ही होती. सुदैवाने तस काही झाले नाही. जसा-जसा तू उभा व्हायाला लागलां तसा-तसा तू अधिक सुंदर दिसायला लागला आणि ही सुंदरता आणि तुला परिप्कव करण्यासाठी पाणी मीच तर देत होती, मला पहायचं होत तुला, तू कसा दिसणार असंशील, मी आजपर्यंत माझ्यासोबत हे दगड, झाडें, झुडपे, पाणी प्यायला येणारे प्राणीच पाहत होती, पण या सर्वात तू वेगळा दिसत होता, अगदी वेगळा. मी येथून वाहत तर होती पण माझं लक्ष तुझ्यावरच केंद्रीत होत. रोज तुझ्यात काही ना काही बदल होत असतांना दिसायचे, अनेक लोक तुला बनवण्यात व्यस्त होती, जसा मला या निसर्गाने जन्म दिला तसाच जन्म ते तुला देत होती, वेगवेगळी आकारात तुझं रूपांतर होत होत आणि एकदाच तू घडल्यास, समोर डोम सारखं नंतर दोन्ही बाजूला दोन मोठमोठया खोल्या, जस हृदयच ते, त्या दोन्ही बाजूच्या आत मध्ये अजून एक कप्पा, त्यांच्या बाजूला आणखी एक खोली, समोर दोन्ही बाजूला छान वटा. अगदी तूझ्या हृदयाजवळ असं दोन्ही बाजनी. दोन्ही हृदयच्या मधोमध एक गोंडसंवाना चेहरा. ते तुझं रूप, माझ्या पात्रा जवळून पहिले तर तू एकदम भारदस्त दिसत असायचा. तेव्हा मी पहिल्यांदा तुझ्यात माझा मित्र शोधायला लागली आणि तू तो मित्र आहेस. ज्याने ही माझी साथ तेव्हापासून सोडली नाही, अगदी आतापर्यंत आणि पुढे पण तू माझ्यासोबत राहशील अशीच प्रार्थना असते माझी. तुझ्यात मी कधी वाहत गेली कळलच नाही, म्हणून तुझ्या हृदयात येण्यासाठी वाहत असते मी. अगदी तुझ्याजवळ यायचे, तुझ्यावर पाण्याचा शिडकाव करायचे, तो शिडकाव म्हणजे जवळ येण्याची आस होती तुझ्याजवळ, पण जसा पावसाळा पूर्ण व्हायला लागायचा आणि थंडीला सुरुवात व्हायची तशी-तशी मी निस्तेज व्हायला लागायची, कारण माझं तेज तू होत, हळुहळु काही दिवसांनी तर तू मला दिसायचा सुध्दा नाही. तुला पहायचा प्रयत्न करायचे पण निसर्गाचा नियम मला मोडता येते नव्हाता. प्रथम कर्तव्य नंतर स्वतः माझा जन्मच मुळात दुसऱ्याचे भविष्य बनविण्यासाठी झाला आहे. तू पण त्या भविष्याचा भाग आहे सं नारे संख्या. म्हणून मला वाहत राहवं लागत, नंतर तर कडक उन्ह तपायाला लागायची आणि मी मरते की काय असे व्हायच, त्या यातनेला मला तूच दिसायचा विश्राम, तुला विशू म्हटलं तर चालेल ना रे? रागवणार नाही ना माझ्यावर. उन्हात तू पण तापायांचा पण मला समाधान होत माझे निसर्गसोबती झाडें तुला दोन्ही बाजूनी मायेची सावली दयायचे, म्हणून माझी काळजी कमी व्हायची पण तुला एक सांगू माझी खूप



चीडचीड व्हायची जेव्हा कुणी दोन पायचा प्राणी तुझ्या हृदयात थांबायचा. मला Jelosy फिल व्हायचे, अंतकरण दुखायचं माझं, खूप त्रास व्हायचा मला, तुझ्या हृदयात कुणी दिसलं की, अस वाटायचं जवळ याव काढून टाकवे त्या प्राण्याला तुझ्यापासून लांब. पण मग विचार करायचे, तू पण तर तुझ्या जन्मदात्याने ज्यासाठी तुला निर्माण केले आहे. ते कर्तव्यच बजावतोय ना. तू पण अहो रात्र कर्तव्यच पार पडतोय. मला तरी माहित असत माझ्या प्रवाहत कोण कोण असते म्हणून, तुझं तर तस पण नाही, तुझ्या हृदयात शिरणारे, रोज बदलायांचे, मला त्रास व्हायचा, पण मग मी स्वतःची समजूत घालत असे. तू पण तेच करतोय जे मी करते, कर्तव्य आणि कर्तव्य. माझं पण तुझ्यावर खूप प्रेम आहे.

प्रिय गडगे,

मी खूप आनंदी आहे आज की, तू पण माझ्यावर तेवढच प्रेम करते जेवढे मी करतो, खूप छान वाटतय. अस वाटतंय तुला सोबत घेऊन दूर लाँगड्राईव्हवर जावं, क्षितिजच्या पलीकडे. तुला माहिती आहे हे आजूबाजूचे झाडें मला तुझ्या नावाने हाक मारायची, मला चिडवायचे, पावसाळ्या तर त्रास अन त्रास देत असत, मी म्हणायचो त्यांना तस काही नाही रे आमच्यात, पण ऐकतील ते कुठले.

आज तुझ्या भावनेनी माझं मन भरून आले आहे. मला कल्पना आहे. आपण एकत्र कधीच येऊ शकणार नाही पण मनाचे मात्र आपण सोबत असू शेवट पर्यंत. तू तुझं आणि मी माझ कर्तव्य निष्टेने पार पाडू. तू लोकांची, प्राणी जीवाची तृष्णा पूर्ण कर मी माझ्या कुशीत येणाऱ्या लोकांचा आश्रम पूर्ण करतो.

■ ■ ■





9

# मेळघाट एक नंदनवन

सुनिल वाकोडे
वन परिक्षेत्र अधिकारी,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प



## "मेळघाट" माझी कर्तृत्व आणि कर्तव्य भूमी...

मी, मेळघाटचा आणि मेळघाट माझा इतकं सहज सोपे गणित नाही. निसर्गाने मेळघाटला भरभरून दिले आहे. मेळघाट हा अप्रतिम, अलौकिक असे नयनरम्य निसर्ग सौंदर्याबरोबरच वनसंपदा व जैवविविधतेने समृध्द आहे.

या जंगलाने माझे आयुष्य खुप सुखी केलं. निसर्गाचे अनंत उपकार आहेत. माझ्यावर मेळघाटच्या जंगला-तल्या प्रत्येक दृश्य, अनेक घटना डोळयांचे पारणे फेडणार्या असतात. खरेतर त्या बधणार्याच्या नजरेवर आणि भावनेवर अवलंबून असतात. पण आम्ही ठरलो जंगल वेडे, सतत जंगल संरक्षण आणि संवर्धनाचा डोक्यात विचार, पण तरीही ह्या पक्षांच्या, प्राण्यांच्या हालचाली, संवादात गुंतत जातो.

एखाद्या सुंदर वृक्षावर बसून सतत उंच स्वरात, तर कधी मोहक आवाजात गाणारा पक्षी एकटक बघत, ऐकत रहाणे असे नयन मनोहर दृष्य बघायला मिळणे, आमच्यासाठी नजरेचे पारणे फेडणारे असते. हे असे सुरू असतांना प्रत्येक वेळी नविन काही तरी बघायला मिळतेच. जंगलातला प्रत्येक दिवस वेगळा असतो, त्यांची ओढ एक एक गुढ वाढवत जाते आणि ते गुढ उकलतांना एक वेगळा आनंद मिळतो. मग वाटतं की आपल्या एवढे या जगात सुखी कोणीच नाही. आपल्या इतके आपणच सुखी.

माझ्या फॉरेस्ट क्वार्टर्स भोवती सतत पक्षांचा, प्राण्यांचा वावर असतो. भल्या पहाटे पक्षांची किलबिलाहट सुखावणारी, जगाचा विसर पाडणारी असते.

उन्हाळ्यात तर प्राणी व पक्षी पहाणे, निसर्ग अनुभव घेणे निसर्ग प्रेमींसाठी एक पर्वणीच आहे. महत्वाचे म्हणजे मेळघाट मध्ये अजुनही सर्व व्यवस्था वन विभागाच्या हाती आहे. त्यामुळे मेळघाट हे व्यापारीकरण पासून दूर आहे. अतिशयश आस्थेने व आपुलकीने पर्यटकांचे स्वागत केले जाते. इथले वन्यजीव, पक्षी-प्राणी, झाडे मोकळा श्वास घेत असल्याची जाणीव आपल्याला खचितच होईल.

वन विभागाने इथल्या जैवविविधतेची संगोपन व संवर्धन, उत्तम रितीने संरक्षित केलेले आहे. वन कर्मचारी जंगलाचे आणि त्यातील







प्रत्येक घटकांचे प्राणपणाने रक्षण करतात. विपरीत नैसर्गिक परि- स्थितीत दिवस रात्र काम करून वन कर्मचारी जंगलाचे, तेथील वनांचे, जैवविविधतेचे अत्यंत बारकाईने संरक्षण, संगोपन व संवर्धन करतात. वन्यजीव, जंगल सुरक्षित ठेवण्यासाठी सदैव तत्पर असतात. उन्हाळ्यात जंगलात ठिक ठिकाणी पाणवठे व चाटण केलेले असते, अशा ठिणी अनेक पक्षी व प्राणी पाणवठ्यावर पाणी पिण्यासाठी आलेले दिसतात. उन्हाळ्या काहीलीने सर्वांनाच हैराण केलेल असते. त्यात पशू-पक्षांचे तर खूपच हाल होतात. म्हणून पाणवठे कृत्रिम रित्या पाणी टाकून वन विभागाने बनवलेले आहेत. तसेही ते आमचे कर्तव्यच आहे. तिथे अनेक पक्षी, वन्य प्राणी, पाण्यावर येत असतात. त्यामुळे त्यांची नोंद घेण्याची, निरीक्षणाची एक मोठी संधी पर्यटकांना मेळघाट मध्ये मिळते.

दरवर्षी उन्हाळयात वन्य प्राणी व पक्षी यांच्यासाठी सतत पाणवठयात पाणी टाकले जाते. वन्यजीवांच्या पाणवठयावरच्या हालचाली आणि नोंदी घेण्यासाठी ट्रॅप कॅमेरे बसवलेले आहेत. त्यामुळे जंगलातील अनेक प्राणी व पक्षी ट्रॅप कॅमेरात कैद होतात. त्यामधे वाघ, बिबट्या, अस्वल, हरण, सांबर, गौर... इतकेच काय तर बुलबुल, कधी डव्ह होले, मैना, गवई, चंडोल, पारवे, पोपट असे विविध त्यांच येणंजाणं तिथेच खेळणे, बागडणे, जागेसाठी एक- मेकांशी भांडणे, सावधपणे पाणी पिणे आणि भुरर्कन उडून जाणे. ह्यांच निरीक्षण म्हणजे एक ब्रह्मानंद असतो, चांगली जागा, आहार व पाण्याची व्यवस्था मेळघाट मध्ये असल्याने विविध प्रकारची जैवविविधता इथे आपल्याला अनुभवता येते. खाटीक, नाचन, पिवळया कंठाची चिमणी, लावे, पोपट, मोर, सोबतच कामर्या ढोक आणि टिटवी, मधुबाज, रानपिंगळा (जंगल आउलेट) यासारखे अनेक पक्षी आपल्या सौंदर्याची मोहिनी घालतात. तर वाघ, बिबटया, अस्वली, रान मांजर, सिवेट कॅट, जंगली कुत्री, जंगली डुक्कर, चितळ हरण, सांबर, निलगाय, गौर, भूंकण हरिण, ... इ. जैवविविधतेने समृध्द असा आहे मेळघाट.

मेळघाट ही जैवविविधतेची परिपूर्ण परिसंस्था आहे. झाडांची विविधता साग, अर्जुन, खैर, पळस, पांगारा, तेंदू, ऐन, धावडा, बहावा, काटेसावर, चारोळी, कुसूंब, आवळा, बांबू, माहावृक, मोहा अशी इ. झाड. तर रानगवत, रानफुल अस एक समृध्द वन संपदा आणि जैवविविधता मेळघाट जंगलात आढळते.





कुठं आणि कसे आणि काय जंगल अनुभवणे हे महत्वाचे. शांतपणे प्राणी व पक्षी त्याचा संवाद, वावर, मंद वाऱ्या बरोबर येणारा मोहक सुगंध, जंगल अनुभव खूपच आनंद देतो. जंगलात वसंताचे आगमन म्हणजे तो सृष्टीला नटवतो. भास्कराच्या प्रखर तेजाने मेळघाटच्या रोमारोमात जशी ऊब संचारते आणि ह्या मिलनात ओथंबुन सृष्टीच्या नविन रूपाचे दर्शन होते. सृष्टीच्या रोमरोमात जीवनदायी उब संचारतो. या मिलनाने नव्या सृष्टीचे दर्शन आपल्याला होते. सूर्याची कोवळी किरणे प्रखर होत जातात. तसतसा मेळघाट त्या प्रखरतेत नटत जातो. मात्र ह्या रविराजांच्या किरणाशी जवळीक साधायला सुरूवात झाली की पळस, काटेसावर, पांगारा, बाहावा बोलू लागतात. फुलतात... फुलवतात. रखरखत्या उन्हातही यांचा भडक रंग न जाणवता मन प्रफुलिलत करतो. ऊर्जा निर्माण करतो.

जंगलात, काटेसावर-पळसाची झाडं पानं गळलेली मात्र फुलांनी बहरलेली दिसतात. पळस सुखत चाललेल्या जंगलात आपले वेगळे अस्तित्व टिकवून अधिक प्रभावीपणे लक्ष वेधून घेतो. आणि म्हणूनच 'Flame of the Forest' म्हणून ओळखला जातो. मेळघाट मध्ये पावसाळयात फिरणे परमानंद असतो. पावसात भिजत मेळघाट बघायला मिळणे अहो भाग्य! झाडांवरून टप टप आवाज करत गळून पडणारे थेंब मोतीच जणू. त्यावेळी दूर वरून ऐकू येणारी शिळ यातही मनमोहक संगीत सोहळा सुरू असल्याची जाणीव होते. कान तृप्त करतात. मेळघाट मध्ये अतुलनीय असे अद्‌भुत सौंदर्य दडलेले आहे. पावसाळयात गवतावर इवल्याशा रानफुलांचा बहार सुरू होतो. हिरवे पोपटी धुमारे दिसू लागले की तेवढेच छोटे छोटे जीव, डोळयांना ही लवकर दिसणार नाहीत. बारकाईने लक्ष वेधून घेत रानफुल सौंदर्याचा खजिना घेऊन अवतरलेली असतात. शब्दात मांडता येत नाही असे जंगलाचे वैभव मनाने अनुभवून डोळयात साठवून... ह्या हिरव्या मेळघाटची जादू काही औरच आहे. मनात एक वेगळीच ऊर्जा, चैतन्य निर्माण करते. कधी रविराज इंद्रधनुष्यावर घसरगुंडीसारखे करतात. तर कधी ढगांच्या धुक्यात हरवून जातात. विलोभनीय निसर्ग सौंदर्यात आपण देहभाग विसरून पूर्ण पणे जंगलमय होतो. पावसाळयात मेळघाट मन धुंद करणारा असतो.

जंगलातील ही धुंदी, नजारा, गंध, नाद.

सतत या जंगलाच्या प्रेमात असलेले... जंगलात जगणे, जंगलच जीवन गाणे वेगळेच असते या जंगलाचा मोह ज्याला जडला तो मेळघाट शिवाय





जगू शकत नाहीत... असे जगणे म्हणजे ऑक्सिजन शिवाय श्वास... नवनविन अनुभवायला जंगलात... सृष्टीचा कणं कण... प्रत्येक ऋतूचा वेगवेगळा सोहळा... जणू काही उत्सव भरलेला असतो मेळघाटमध्ये निसर्ग वाटा धुंडाळताना अनपेक्षित काही नजरेत भरतं... मन गुंततं... आणि उत्सुकता स्वस्थ बसू देत नाही. मग सुरू होते शोध मोहिम. जंगलात काय आणि कसे, कधी घडेल हे अकल्पित असते. वरवर शांत भासणारं जंगल... श्वास रोखून पुढे काय घडणार ह्याची हूरहूर... जंगल भटकंती मध्ये हमखास दिसणारे दृश्य म्हणजे वानर जी उंच झाडावरची पान, फूल, फळ स्वतः तर खातातच पण खाली चरणाऱ्या प्राण्यांना पण टाकतात. हरणांशी तर विशेष मैत्री... जंगलात प्रत्येक प्राणी महत्वाचा असतो. शिकारीला निघालेला प्राणी, सगळयात प्रथम ह्यांना समजते. निसर्गातले हे घटक नेहमीच एकमेकांना मदत करत आलेले आपण पहातो. निसर्गाची शक्ती अफाट अनाकलनीय आहे.

संवेदनशील मन हवे समजून घ्यायला. ही अशी बंदर व सांबर पाय आपटून वैशिष्ट्य पूर्ण आवाजात सावधानतेचा इशारा देतात. सळसळतं गवत... त्यावेळी असणारी अनामिक अस्वथता... थरारक... थरार... एकाएकी रानडूक्करांचा कळप सुसाट पळत... फडफड आवाजात... मोराचे मियॅव मियॅव करत उडून दूरची झाडावर झेप... पळत सूटलेली हरणं... आणि अचानक समारे आलेला वाघ... कान आणि डोळयातून मनाच्या खोल उतरत साठवणूक...

निःशब्द... अचंबित असा सुखद धक्का... वेळ काळाचे भान राहत नाही... असा अवर्णनीय अनुभव मेळघाटमध्ये घेतला पाहिजे.

■ ■ ■





10

# दुर्गरत्न गाविलगड

**सिध्दार्थ नागरकर**
मेळघाट व्याघ्र प्रकल्प

मेळघाट परिसर हा अमरावती जिल्ह्याच्या उत्तरेकडे स्थित आहे. तापी नदी मेळघाट व्याघ्र प्रकल्पाच्या उत्तरेकडील टोकापासून नदीच्या पाणलोट क्षेत्रातील जंगलातून वाहते. मेळघाट वन्यजीव अभयारण्य हे 1985 साली तयार करण्यात आले. येथे विविध प्रकारचे प्राणी आणि पक्षी आढळतात. ऐतिहासिक किल्ले, नरनाळा आणि गाविलगड हे या राज्याचे रक्षण करीत होते. आपण आज गाविलगड बद्दल थोडे जाणून घेणार आहोत.



पीर फत्ते दरवाजावरील फार्सी (परशियन) भाषेतील शिलालेख

गाविलगड हा दक्खन पठाराच्या उत्तरेस मराठा साम्राज्याचा एक सुधढ पर्वतीय किल्ला आहे. शतकानुशतके बेरार (आधुनिक काळातील वर्हाड) येथे वास्तव्य करून असलेल्या गवळी लोकांच्या नावावरून या किल्ल्याचे नाव पडलेल दिसते. पूर्वी हा किल्ला मातीने बांधलेला होता. नंतर यांची दगडी बांधणी झाली. बांधकामाची नेमकी तारीख सापडत नाही. परंतु फारसी इतिहासकार फरिश्ता याने नोंदवले आहे की मुझ्झ अफ्रीड घराण्या चे नववे राजा अहमद शाह वाली यांनी 1425 मध्ये एलिचपूर येथे तळ ठोकला होता तेव्हा त्यांनी गाविलगड बांधला.



दगडी शिल्प कोरलेला शार्दूल दरवाजा

पुढे ई.स. 1488 मध्ये इमादशादी घराण्यातील मूळ पुरूष फत्ते उल्लाह इमाद उल मुलक यांनी किल्ल्याची दुरूस्ती केली व विस्तार केला. फत्ते उल्लाह इमाद उल मुलक हा विजयनगर साम्राज्यातील एक ब्राम्हण मुलगा होता. बहामनी राज्याचा बेरार प्रांताचा सेनापती खान ए जहाँन च्या खास मर्जीतील हा मुलगा पुढे बहामनी राज्याचा सेनापती बनला. बहमनींच्या पडत्या काळात त्यांनी 1490 मध्ये गाविलगडावर इमादशाहीची स्थापना केली.



गाविलगडचा परकोट



गाविलगडाची स्थापना करतांना त्याने शार्दूल दरवाज्याची निर्मिती केली. या दरवाज्यावर विजयनगर साम्राजायचे चिन्ह गंडभेरूंड कोरले. त्याचे बरोबर शार्दूल (वाघ) व खजूराचे झाड ही मुसलमानी शासकांची चिन्हे ही कोरली. 1572 मध्ये गाविलगड निजामशाहीत सामील झाला. बैरम खान यांनी 1577 मध्ये निजाम-शाहीच्या कारकिर्दीत किल्ल्याची पुन्हा दुरूस्ती केली व एका बुरूजावर शिलालेख कोरला. 1598 मध्ये मुघल बादशाह अकबर ने गाविलगडचा ताबा घेतला. परंतु मलिक अंबर ने तो पुन्हा निजामशाहीत आणला. शाहजान च्या काळात गाविलगड पुन्हा मुघल साम्राज्यात गेला. 1738 माह्ये रघुजी भोसलेंनी गाविलगड ताब्यात घेतला. पण नंतर तो पुन्हा निझामाच्या (हैदराबाद चा निझाम) ताब्यात गेला. निझाम आणि पेशवे यांच्या भांडणाचा फायदा घेऊन मुधोजी भोसले यांनी 1572 मध्ये गाविलगड जिंकून घेलता.

गाविलगड किल्ल्याच्या विस्तार मोठा आहे. किल्ला 2 भागात विभागलेला. बाहेरचा परकोट व आतील मुख्य किल्ला. बाहेरच्या तटबंदी लागत पाण्याचा तलाव दिसून येतो. त्याला मछली तलाव म्हणतात. तो तलाव नसून परकोटाचा खंदक आहे. संपूर्ण परकोटाला संरक्षणाच्या दृष्टीने दुहेरी तटबंदी बांधलेली आहे. परकोटाच्या एका बुरूजावर 22 ओळींचा संस्कृत शिलालेख आढळतो. या शिलालेखात बुर्हान इमादशाह यांच्या जन्माच्या तारखेचे तपशील दिलेले आहेत. आतल्या तटबंदीत 2 दरवाजे बांधले आहेत. बिरभान दरवाजा व मोझरी दरवाजा. परकोट व मुख्य किल्ला या मधील दरीच्या तोंडावर पहाऱ्यासाठी बांधीव चौकीची रचना केली आहे. या चौकीवरून परकोटाचा दरवाजा, मुख्य किल्ल्याचा दरवाजा व दरी या सगळीकडे एकाच वेळी लक्ष ठेवता येत असे. मधली दरी ओलांडून बांधीव पायर्यांच्या मार्गाने आतल्या किल्ल्याच्या मुख्य दरवाज्य पाशी पोहोचता येते. हा दरवाजा शार्दूल दरवाजा या नावाने ओळखला जातो. पुढचा दिल्ली दरवाजा हा शार्दूल दरवाज्याला काटकोनात बांधला आहे. गडाच्या नैऋत्य दिशेला चोर दरवाजा आहे. चोर दरवाज्याचा पुढे आधी उल्लेख केलेला बैरम बुरूज लागतो. गडावर बिजली तोफ, कालभैरव तोफ, पिरफते तोफ व लोहारी तोफ अशा तोफा आढळतात. गडावर सर्वात उंच सुंदर व सुस्तिथितील वस्तू म्हणजे जमा मशीद. याला मोठी मशीद किंवा राणी महाल पण म्हणतात. या वास्तूच्या उत्तरेकडील दरवाज्यातून बाहेर पडल्यावर फते उल्ला इमाद उल मुलक चे थडगे आहे. या व्यक्तिरिक्त



किल्ल्यावर बरसाती तलाव, धमाजी तलाव सोनकिल्ला बुरूज व एक छोटी मशीद देखील आहे.

गाविलगडावर फारशी ज्ञात नसलेली पण एक महत्त्वपूर्ण लढाई होऊन गेली. 1803 मध्ये ब्रिटीश ईस्ट इंडिया कंपनीच्या सैन्याने सर आर्थर वेलेस्लीच्या नेतृत्वाखाली बेरारचे राजे राघोजी भोसले व्दितीय यांचा किल्लेकर राजपूत बेनी सिंग यांचा पराभव केला. या लढाईत इंग्रजांचे जेमतेम 130 लोक मारले गेले. तर मराठ्यांच्या 1200 मावळयांचा मृत्यु झाला. सेलेकशन्स फ्रॉम द डिसपॅचेस अँन्ड जेनेरल ऑर्डर्स ऑफ फिल्ड मार्शल ड्यूक ऑफ वेलिंग्टन या पुस्तकात संपादक मरे यांनी सर आर्थर वेलेस्ली यांचे या लढाईतील अनुभव मांडलेले आहेत.

जॅक वेलर - एक इंग्रजी इतिहासकार गाविलगडाबद्दल म्हणतात की गाविलगडाच बांधकाम व भौगोलिक रचना इतकी अप्रतिम आहे की खडक आणि दगडांनी सज्ज असलेल्या बॉय स्काऊट्स 3 सैन्य तुकड्या त्यांच्यापेक्षा कित्येक पटीने जास्त असलेले व्यावसायिक सैनिक बाहेर ठेऊ शकतात.

आसा हा मेळघाटातील अप्रतिम किल्ला जरूर पहाण्याजोगा आहे.

■ ■ ■







11

# अविस्मरणिय व्याघ्र गणना


चंद्रकांत झटाले
अकोला




वर्षातून एकदाच बौध्द पौर्णिमेला आयोजित होणारे मेळघाटातील सेन्सेस (चंद्र प्रकाशात मचाणावरून प्राणीगणना) आयुष्यात प्रत्येकाने एकदा तरी अनुभव-लेच पाहिजे. हा थरार मी आयुष्यात विसरू शकणार नाही. अद्‌भुत, रोमांच, निसर्ग सौंदर्य अशा सर्व गोष्टी एकत्रितच अनुभवायला मिळाल्या. या वनविभाग व मेळघाट व्याघ्र प्रकल्पाव्दारे बौध्दपौर्णिमेला आयोजित करण्यात येणाऱ्या प्राणीगणना (सेन्सेस) मध्ये आयुष्यात प्रथमच सहभागी झालो. सर्व वन्यजीवप्रेमी, पक्षीप्रेमी, निसर्गप्रेमींकरिता सुवर्णसंधी असलेल्या या सेन्सेस बद्दल फेसबुकवर माहिती मिळाली आणि मी ऑनलाईन नोंदणी केली. नोंदणी करतांना विभाग चिखलदरा निवडला. 29 तारखेला रात्री निघालो आणि सकाळी चिखलदरा पोचलो.

व्याघ्र प्रकल्पाच्या रेंज ऑफीसला हजर असल्याची नोंद केली. तेथील लक्ष्मण आवारे साहेब (RFO) यांना भेटून मी हजर असल्याची नोंद केली. तिथे इंदोर, मुंबई, नाशिक, नागपूर, अमरावती सह विविध भागातून लोक ऑनलाईन नोंदणी करून सहभागी झाले होते. प्रत्येकाला एक किट देण्यात आली होती. त्या किट मध्ये एक मोठे मेळघाट बद्दलचे माहिती पुस्तक, एक मेळघाटातील वन्य प्राणी - पक्षांबद्दलचे छायाचित्रांसह माहिती पुस्तक, उन्हापासून संरक्षणासाठी टोपी बिस्कीट - चिवडा पाकिटे, जेवणाचे एक पाकिट व जे प्राणी - पक्षी दिसतील त्यांची नोंद करून ठेवण्यासाठी तीन आखलेले फॉर्म होते. सर्व लोक आल्याची खात्री फॉर्म होते. सर्व लोक आल्याची खात्री होताच सर्वांच्या जेवणाची व्यवस्था करण्यात आली. जेवण आटोपल्यावर चिखलदरा विभागात जितकी मचाने आहेत त्यांची नावे लिहून चिठठ्या बनविण्यात आल्यात. ज्याचे नाव घेतल्या गेले. त्याने त्यातली एक चिठ्ठी उचलायची आणि ज्या नावाची चिठ्ठी निघाली त्या मचाणावर जायचे. त्याला चांगली जागा दिली, मला फालतू जागा दिली हा वाद होऊ नये म्हणून आयोजकांकडून ह्या लकी ड्रॉ पध्दतीने ठिकाण ठरविल्या जाते. आवरे सर व एस.डी. राठोड सर RO यांनी जंगलात जातांना घ्यावयाची काळजी, परफ्युम नको, भडक कपडे नको, जेवण झाल्यावर उरलेलं अन्न जंगलात टाकायचं नाही, त्याचा वास फेलणार नाही. अशा प्रकारे पॅक करून ठेवायचं वगैरे सूचना दिल्या.

मचाणावर जाण्यासाठी आम्हाला जिप्सी गाडीने जंगलातील कोअर एरियात म्हणजे जिथे वर्षभर वन अधिकाऱ्यां-व्यक्तिरिक्त कुणालाही जाण्याची परवानगी नसते व वन्य प्राण्यांचा मुक्त संचार असतो त्या भागात सोडले गेले. 2 जिप्सी होत्या त्यात एका गाडीवर



झाकीरभाई तर दुसऱ्या जिप्सीवर जावेदभाई नावाचे तिशीतील तरूण. पिली गावापर्यंत रस्ता होता त्यासमोर पूर्ण पाऊलवाट ती पण डोंगरात. भयंकर चढ – उतार, घनदाट जंगल. जे चारचाकी वाहन चालवु शकतात. तेच त्या दोन ड्राय-व्हरचा भीम पराक्रम समजू शकतात. याच प्रवासात रानगव्यांचा कळप, जंगली डुक्कर दिसले. जंगलातील सुरक्षा चौकीतून (कॅम्प) प्रत्येकाला आपल्याला भेटलेल्या मचाण स्थळी जंगलातून पायी जातचे होते. यावेळी प्रत्येक व्यक्तीसोबत एक व्याघ्र प्रकल्पातील अधिकारी किंवा कर्मचारी होता. महिलांसोबत वनिता खिराडे व प्रत्येकी एक महिला कर्मचारी होत्या. फक्त माझ्याच सोबत योगायोगाने 2 लोक आले. हे मचाण जिप्सीने सोडलेल्या कॅम्प पासून कुणाचे 1 कि.मी. तर कुणाचे 5 कि.मी. असे होते.

मला मिळालेल्या ठिकाणचे नाव बारूला होते. सोबत एक झाकिर नावाचा गाईड आणि रमेश नावाचा पिवर आदिवासी कोरकू वनमजूर. पिवर यासाठी बोललो कारण त्याच्या म्हणण्याप्रमाणे तो ओरिजनल आदिवासी होता. आमचं मचाण कॅम्प पासून दीड-दोन कि.मी. वरच्या बाजूला होत. आपल्याला एकट्याला चालणं मुश्किल तिथे रमेश 20 लिटरची पाण्याची कॅन खांद्यावर घेऊन, कॅमरेला स्वतःची पिशवी बांधून आमच्या समोर करंकरं चालत होता. 30 तारखेला दुपारी 3.30 ला मचाणवर पोचलो. मचाणावर सामान चढवून तेथील नैसर्गिक पाणवठा व थोडा आजूबाजूचा परिसर बधितला. या पानवठ्याला बारा ही महिने पाणी असते, तो कधीच आटत नाही म्हणून त्याला 'बारूपाणी' असे नाव आहे. पाणवठा म्हणजे एक अगदीच छोटंसं डबकंश बधितल्यावर वाटलं इथे कोण प्राणी येणार पाणी प्यायला? एक तर आजूबाजूला सर्व टेकडे त्यावरून कोणी प्राणी येणार की नाही? आपला कार्यक्रम फेल जातो की काय? अशा शंका मनात यायला लागल्या. गोष्टी गोष्टीत सायंकाळचे 6 वाजले. झाकीर काही गोष्टी करायचा थांबत नव्हता. रमेश म्हणाला आपण जर बोलत राहिलो तर कुणीच प्राणी येणार नाही. मग झाकीर ला जबरदस्ती झोपायला लावलं. आम्ही बसून कुणी प्राणी येतो का यांची वाट बघायला लागलो. थोड्याच वेळात एक मोर आला, जंगली कोंबडा आला, तीन पांढरे मोठे घुबड आले. आता अंधार पडला होता. आम्ही तिघांनी सोबत आणलेली शिंदोरी सोडून जेवून घेतलं. दिवसभराच्या धावपळीने शरीर थकलं होत, बसल्या बसल्यात तिघंही झोपलो. कशाच्या तरी आवाजाने मला जाग आली बघतो. तर मचानाच्या अगदीच जवळ एक भला मोठा रानगवा होता. माझ्या फक्त थोड्याश्या हालचालींची चाहूल लागून तो सावध झाला होता. 15 ते 20 मिनिट तो एकाच एकाच जागी स्थिर उभा राहून आजूबाजूची चाहूल घेण्यांचा प्रयत्न करत होता. त्याला काय वाटलं के माहित पण पाणी न पिताच तो निघून गेला. मग पुन्हा झोप लागली. रात्री 11.54 मिनिटांनी सोबत असलेल्या झाकीर ने मला उठवले व हळूच कानात बोलला, 'सर, टायगर है टायगर'. माझ्या आनंदाला पारावार उरला नाही. भयंकर एक्साईटेड झालो होतो पण भावना आवरून हळूच जिथे होतो. तिथेच उभा राहून पाणवठ्यावर पाहू लागलो. चंद्रसखस लख्ख प्रकाश होता पण त्या पाणवठ्याच्या वरच्या बाजूला झाडांची सावली पडत असल्यामुळे स्पष्ट दिसत नव्हतं. पण 3-4 प्राणी वरून खाली उतरले होते. सगळीकडे कडक वाळलेल्या साग, अमलतास, बांबू व इतर झाडांच्या पानांचा खच पडलेला असल्यामुळे दूर वरुनच



पावलांची चाहूल जाणवत होती. 4 पैकी 3 प्राणी पाणी पीत होते, त्यातला एक पाण्यातच बसला होता. मला झाकिरच्या बोलण्यावर विश्वास वाटत नव्हता की ते वाघ आहेत. कारण जिथे मेळघाटात 1 वाघ दिसणे मुश्किल तिथे 4 वाघ कसे दिसणार? जंगली कुत्रे किंवा डुक्कर असतील असा विचार करत असतानाच त्या प्राण्यांना आमची चाहूल लागली कारण आम्हाला जरी ते स्पष्ट दिसत होतो. जशी चाहूल लागली तसे ते पटकन वरच्या टेकड्यावर चढायला लागले, 2 डाव्या बाजूला झाडांच्या सावलीने पळाले तर दोन सरळ वरच्या बाजूने चढत असतांना त्यातला एक प्राणी जोरात डरकाळीवजा गुरगुरला आणि ते दोन्ही प्राणी चंद्रप्रकाशात स्पष्ट दिसले, त्याचे डरकाळल्याने आणि दर्शनाने एकदम अंगावर काटा उभा राहिला, काळजात धस्स झालं. थोडा घाबरलो पण काही तरी दुर्मिळात दुर्मिळ मिळविल्याचा अगणित आनंद मनात मावत नव्हता. जंगलाचा राजा ज्याला बघण्यासाठी लोक अनेक वर्षांपासून मेळघाटात येत आहेत, ज्याच्या एक सेकंदाच्या झलकेसाठी कितीही दुरून लोक यायला आणि कितीही पैसा खर्च करायला तयार आहेत तो वाघ साक्षात समोरून जात होता. मन अतिशय प्रसन्न झाले होते. अनेकांकडून फक्त ऐकले होते की मेळघाटात वाघ आहेत, पण विश्वास वाटत नव्हता. आता बघितल्यावर विश्वास बसला. फक्त वाघच नाही तर त्यांची दहशत पण अनुभवली, कारण एकदा वाघ येऊन गेल्यानंतर सकाळपर्यंत कोणताच प्राणी तिकडे फटकला पण नाही. वाघ ज्या भागात राहतो त्या भागात तो त्याच्या विष्ठेव्दारे गंध सोडतो. त्याच्या शरीराचा पण खूप तीव्र गंध असतो. त्यामुळे त्या भागात दुसरे प्राणी येत नाहीत. ते वाघ पुन्हा परत पाणी प्यायला येतील की काय या उत्कंठेने झोपच आली नाही, सारखा विचार येत होता की हेच वाघ जर सायंकाळी अंधार पडण्या अगोदर किंवा सकाळी उजाडल्यावर दिसले असते तर चार वाघांचे एकत्र फोटो काढले असते. तितक्यात एक सर्वात दुर्मिळ जातीचं (फॉरेस्ट औल) घुबड माझ्या बाजूलाच असलेल्या झाडाच्या खोडावर येऊन बसलं. त्याचा फोटो काढू शकलो कारण तो मोबाईलच्या फ्लॅश लाईटच्या टप्प्यात होता. जशी जशी रात्र वाढत गेली तसं तसं अस्वल, मोर, घुबड, रात्रकिड्यांच्या आवाजाने जंगल जागं होत होतं. हा आयुष्यातील अद्भुत अनुभव होता. एक वेगळंच जग अनुभवत होतो. इतके वर्ष मी का यात सहभागी झालो नाही याचा मनोमन खूप पश्चाताप होत होता. सकाळ झाली, उजाडलं होत. लगेच मचानावरून खाली उतरलो आणि पाणवठ्यावर धावलो. वाघांच्या पायांचे ठसे उमटलेले होते. त्यांचे फोटो काढले. मग सामान बांधून आम्ही सुरक्षा चौकीच्या (कॅम्प) दिशेने पैदल निघालो. जंगलात जागोजागी जमिनीत फावड्याने खोदल्यासारखे खड्डे होते. वनमजूर रमेशला विचारलं तर बोलला की हे अस्वलाने केलेले खड्डे आहेत. अस्वल जमिनीत अशेच खड्डे करून त्यातील उधळी खातो. मागच्याच आठवड्यात वाघाने एक जंगली डुक्कर मारल्याची नोंद होती. त्या डुक्कराचा एक पाय पण आम्हाला रस्त्यात दिसला. प्राण्यांच्या विष्टा, पायांचे ठसे, खोदलेले खड्डे, झाडांवर मारलेल्या नखांच्या खुणा यावरून बरीच अचूक माहिती मिळते, फक्त ती समजून घेता यायला हवी. कॅम्प वर आल्यावर एकच जल्लोष कारण सर्व सहभागी मंडळी ज्या वाघाला बघण्यासाठी आली होती तो वाघ फक्त आम्हालाच दिसला होता आणि ते पण तब्बल चार वाघ. सर्वांना त्यांच्या पायांच्या ठश्यांचे फोटो दाखविल्याशिवाय विश्वास बसला



नाही. मग राठोड सरांनी सांगितलं की ती एक वाघीण आहे आणि ते तीन तिचे बछडे आहेत. अनेक सहभागी लोकांना एकही प्राणी दिसला नव्हता. काहींना अस्वल तर काहींना हरण, सांबर, नीलगाय, रानगवे दिसले होते. अशाच आनंद आणि नाराजीच्या मिश्रित वातावरणात चिखलदरा पोचलो. तिथे कोणकोणते प्राणी दिसले. त्यांची यादी आणि मोजक्या शब्दात अनुभव लिहिले. तेथील कर्मचाऱ्यांनी आग्रहपूर्वक तक्रार पुस्तक प्रत्येकाच्या पुढ्यात ठेवले व या आयोजनात काय कमी राहिली? तुमची काय तक्रार आहे ती कृपा करून लिहा जेणे करून आम्ही पुढल्या वेळी तसे बदल करू असे सांगितले. व्याघ्र प्रकल्प व वनविभागाचे अधिकारी व कर्मचारी हा कार्यक्रम कार्यालयीन न ठेवता अगदीच कौटुंबिक रित्या आयोजित करण्यात 100% यशस्वी झालेत असेच मी म्हणेल. आवारे सर, राठोड सरांसोबतच अंगद देशमुख चिखलदरा पॉईंट कॉर्डिनेटर, नविता खिराडे FG, पंजाब गवई, अफसर पठाण व सर्व चिखलदरा – वैराट पर्यटन गाईड यांची प्रत्येक सहभागी व्यक्ती सोबतची वागणूक, आस्थेने त्यांची विचारपूस, प्रत्येकाला सूचना देतांना त्यांची तळमळ, प्रत्येकाच्या प्रत्येक प्रश्नाचं पूर्ण समाधान हे सर्व आश्चर्यचकित करणारं होतं. सरकारी काम अशा पध्दतीने पहिल्यांदाच बघत होतो. त्यात ठिकाणी अनेक मित्र सुध्दा झालेत.

तुम्हाला आश्चर्य वाटेल की हे वन अधिकारी व कर्मचारी मिळून दर आठवड्याला फक्त मेळघाटात किमान 3500 ते 4000 हजार किलोमीटर जंगलात पायी पेट्रोलिंग करतात. त्यात गाडीने केलेला प्रवास मोजल्या जात नाही. म्हणजे काश्मीर ते कन्याकुमारी अंतर दर आठवड्याला पायी. जंगलात शिकार होऊ नये, गुरे चारणारे गावकरी जंगलात घुसू नये, अवैध वृक्षतोड होऊ नये हा त्या मागील उद्देश. तेही जंगलात फिरतांना एक कर्मचारी व एक वनमजूर दोघेच आपल्याला जबाबदारी दिलेल्या भागात पूर्ण फिरून येतात. जंगलात वन्य हिंस्त्र पशु, शिकारी, लाकडांची तस्करी करणाऱ्यांच्या टोळ्या यांचा धोका असून सुध्दा हे लोक वन सौरक्षण करण्यासाठी रोज आपला जीव धोक्यात घालतात. पण ह्या सर्व गोष्टी सामान्य नागरिकांपर्यंत पोचत नाहीत. अमरावती विभागात जेव्हा पासून एम.एस. रेड्डी IFS हे सर रूजू झालेत तेव्हा पासून त्यांनी इको टुरिझम वर खूप भर दिलाय. मेळघाटातील आणि अमरावती विभागातील कोलकास, चिखलदरा, सेमाडोह सह सर्व रेस्ट हाऊसेस ची बुकिंग त्यांनी ऑनलाईन केली आहे. प्रत्येक ठिकाणी जिप्सीने जंगल सफारी आणि जागोजागी ॲडव्हेंचर स्पोर्टस सुरू केलेत. बच्चे कंपनीसाठी कोलकास येथे हत्तीवरून जंगल सफारी सुरू केली आहे. अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी मनावर घेतलं तर काय सकारात्मक बदल घडू शकतो यांच जिवंत उदाहरणच या लोकांनी समाजापुढे ठेवलंय. सलाम तुम्हाला... तुमच्या कर्तृत्वाला... पुढील सेन्सेसच्या प्रतिक्षेत...

■ ■ ■



12

# रात्री जंगल बोलू लागते तेव्हा...


शिवा इंगळे

अकोला





जंगलात राहत असल्यामुळे जंगलामधील प्रत्येक घटकांच्या हालचाली आता मनाला आनंद देऊन जातात, कारण, त्यामधून काहितरी नवीन अनुभव मिळतो आणि शिकायला मिळते. तसाच एका रात्रीचा प्रसंग वेळ साधरणः 11 वाजताची जिम कॉर्बेट ऑफ कुमाऊँ हे पुस्तक वाचण्यात मग्न असतांना अचानक आवाज आला. अगदी शांत राहून आवाज कुठून येतोय व कशाचा येतोय हे लक्ष देत टॉवर (मचान) वर चढलो तर आवाज वानरांचा येत होता. जंगलातील सर्व प्राणी जणू आपली ड्यूटी बजावत होते आणि ते ही प्रामाणिकपणे. तसे हे माकड (वानर) पण मोठ्यामोठ्याने आवाज करत होते आणि आधी वाचलेल्या जिम कार्बेटच्या मॅनइटर ऑफ लेपर्ड रूद्रप्रयाग या नरभक्षक बिबटयावर आधारीत पुस्तकांमध्ये दिलेल्या घटनावरून आता मला सुध्दा त्याची थोडी फार चाहुल लागली. काही वेळ थांबत शंका मिटली आणि खात्री पटली की, एवढयामध्ये कुठे तरी बिबट आला आहे. मग मनात एक वेगळीच भिती निर्माण झाली होती कारण, काही दिवसांपूर्वी मी पाऊल वाटेवरती चालत असतांना त्याचे पगमार्क पाहिले होते आणि जाणीव होतीच कि बिबटया जास्त रात्रीचा एक्टिव असतो. न-भितीपेक्षा ही आनंद हा होता कि खरंच जंगलातील रात्र आता बोलू लागली आपल्याशी.

वानरांचा आवाज दूरदूर जात असतांना एका क्षणापुरते असे वाटले की, तो आता आपल्याकडे येतोय कि-काय! कारण रात्रीचा गडद अंधार आणि भयाण अशी शांतता त्यात वानरे जिथे जात असे तेवढ्यात माळरानावरील टिटवी पक्षी सुध्दा आवाज करायला लागली होती आणि आता हा आवाज चहुबांजुनी यायला लागला. आता झोप मोडली म्हणून पुन्हा त्याच पुस्तकाची पाने चाळायला बसलो आणि माझे डोळे पुस्तकाच्या पानावर नजर फिरवत होते आणि कान मात्र त्या आवाजाची चाहुल घेत होते. मनात असंख्य विचार येत होते. बराच वेळ गेल्यानंतर आता आराम कराव आणि उद्या सकाळी पगमार्क शोधायला जाऊ असा विचार करत डोळे बंद केले. महान धरणाच्या लाटांचा आवाज आणि थंडगार अशी हवा सोबत रातकिड्यांच्या आवाजात केव्हा झोप लागली कळालेच नाही.

■ ■ ■



13

# वर्षा ऋतूचे आगमन दूत!

मंदार पावगी




प्रत्येक दिवशी सूर्य तापमानाचा नवीन उच्चांक प्रस्थापित करत असतो, पिण्याच्या पाण्याची कमतरतेपासून ते दुर्भिक्षेतकडे वाटचाल सुरू असते, उन्हीची काहिली असह्य, थोडक्यात काय तर वैशाख वणव्यात धरती आणि प्राणीमात्र दोन्ही पोळले जात असतात, मध्य भारतातील मे / जून महिन्यातील हे सर्व परिचित चित्र. अशातच अचानक एका दुपारी दूर कुठून तरी कोकिळेचं (Asian Koel) कुहू कुहू ऐकू येतं. नंतर हा आवाज सकाळी-संध्याकाळी सुध्दा अगदी नियमित येत होतो. गर्द आमराया, दाट सावलीच्या जागा, पाण्याच्या जागा, कडुलिंबाची झाडे इ. ठिकाणी तर हमखास कोकिळेचं कुहू कुहू ऐकू येतं. पुराण काळापासून आपल्या कथांमध्ये संदर्भ दिल्या गेलेले आणि शेतकऱ्यांचे खरे मित्र असलेले अजून दोन पक्षी मे अखेरीस- जून सुरूवातीस हमखास आढळून येतात ते म्हणजे चातक (Pied Cuckoo) आणि पावश्या (कॉमन Hawk Cuckoo). फक्त पावसाचेच पाणी पिणाऱ्या चातक पक्षाच्या दंतकथा प्रसिध्द आहेच आणि पावश्या देखील ओरडायला लागल्यावर शेतकरी जणू काही अधिकृत घोषणा झाल्याप्रमाणे पेरणीच्या कामाला लागतात. चातक पक्ष्यांच्या दोन प्रजाती भारतात आढळून येतात. दक्षिण भारतात यांची प्रजोत्पादन करणारी स्थायी संख्या आढळते तर उत्तर-मध्य भारतात मॉन्सून वाऱ्यांचा मागोवा घेत अरबी समुद्रावरून उडत चक्क आफ्रिकेतून आपल्याकडे हे पक्षी येतात, म्हणूनच कदाचित त्यांचे इंग्रजी मध्ये दुसरे एक 'Rain catcher' असे सार्थक नाव आहे. जसजसा मॉन्सून सक्रिय होत जातो या पक्ष्याचे दर्शन देखील व्यापक भूभागात आढळत जाते.





केवळ जंगलातच आढळणारा असाच एक देखणा पक्षी नेमका मे महिन्याच्या शेवटी / जुन महिन्याच्या पहिल्या आठवड्याच्या सुरुवातीला त्याच्या व वैशिष्ट्यपूर्ण आवाजा सकट दर्शन देतो. आकाराने लहान असलेला हा पक्षी आपल्या अनोख्या रंगसंगतीनें मात्र वरील दोन्ही पक्षांना कॉम्प्लेक्स देत अवतरतो. नऊ रंग लाभलेला हा पक्षी म्हणजे नवरंग. हा पक्षी दिसायला व आवाज करायला लागला म्हणजे कडक उन्हाळा संपून वर्षा ऋतूचे आगमन होणारी निसर्गाची दवंडीच म्हणावी.

पक्षी जगतात अशा घटना घडत असतांनाच निसर्ग वृक्षांच्या दुनियेत एक अनोखा चमत्कार घडवतो. नेहमी पाहत असलेल्या रस्त्यांच्या किंवा शेतीच्या कडेला किंवा मिश्र वृक्षांच्या गर्दी मध्ये अचानक वेड लावणाऱ्या पिवळसर सोनेरी रंगांची एक आतिषबाजी होते. त्याचे नाव बहावा किंवा अमलताश. द्राक्षांच्या झुपक्याप्रमाणे गच्च एकत्र असलेला फुलांचा बहावा गुच्छ पाहणाऱ्याला मंत्रमुग्ध करतो. विशेष म्हणजे वर्षभर बघितलेल्या झाडांच्या भाऊगर्दीत अचानकच एक दिवस बहावाच्या पिवळ्या सोनेरी रंगांची फुले पेट घेतात. फांद्यांच्या टोकाला झुकलेले गुच्छ बघितले जणू काही सुंदर फुलांचे फ्लॉवरपॉट किंवा बुके टांगल्याचा सुंदर भास होतो आणि याचे इंग्रजीत सामान्य नाव अतिशय संर्पक वाटते. Golden Shower Tree.

बहावा हे थायलंड देशाचे राष्ट्रीय वृक्ष आणि राष्ट्रीय फूल देखील आहे. असे म्हणतात की बहावा फुलला की बरोबर 45 दिवसांनी पावसाळा सुरू होतो.

विशिष्ट ऋतुंच्या आरंभी वैशिष्ट्यपूर्ण फुले, फळे, पक्षी आप-आपल्या गुणांसकंट प्रगट होतात, ही निसर्गाचीच योजना आहे. आपल्या ऋतूंचे ते आगमन दूतच असतात. मनुष्य प्राण्याच्या अलीकडील काळातील अवैध आणि पाशवी हस्तक्षेपाच्या अतिरेकाने काही ठिकाणी बिघाड झाला असला तरी ही हे चक्र हजारो वर्षांपासून अव्याहत चालू आहे.

कोकीळ, चातक, पावश्या, नवरंग आणि बहावा हे निसर्गाचे राजबिंडे रूप असलेले वर्षा ऋतूचे आगमन दूतच!!!



# सिडबॉल

**कु. शिल्पा किसन छुकसे**
वनरक्षक,
कासमार बीट काटेपुर्णा अभयारण्य






सिडबॉल म्हणजे माती, शेणखत व कुजलेला पालापाचोळा एका ठिकाणी जमाकरून चाळणीतून गाळून त्या मिश्रणात पाणी कावडयाने कालवाकरून मिश्रण केलेली थोडीशी माती घेवुन त्यात बी टाकुन गोल चेंडू सारखा आकार देणे याला सिडबॉल म्हणतात. सिडबॉल बनविण्याकरीता वनसेवक, वनमजुरांकडून काटेपुर्णा अभयारण्यातील चांगल्या वृक्षांचे जसे अमलतास व निंबाचे निबोळी बी जमा करून मंजुराकडून सिडबॉल तयार करून घेतले. सन 2020-2021च्या पावसाळयात काटेपुर्णा अभयारण्य व कारंजा-सोहळ अभयारण्य मिळून एक लाख सिडबॉल तयार केले आहे. हे सिडबॉल दोन्ही अभयारण्यात रस्त्याच्या बाजुने तसेच ज्या ठिकाणी अभयारण्यातील क्षेत्र विरळ आहे. त्या ठिकाणी नेऊन जमिनीत सिडबॉल टाकुन त्यावर माती टाकणार आहोत. सिडबॉल बनविण्याचे कारण असे आहे की, जमिनीमध्ये जीवजंतु राहतात ते जीवजंतु बी यांना इजा पोहचवतात. त्यामुळे उगम शक्ती कमी होते. सिडबॉलमुळे बी यांना संरक्षण मिळते. तसेच सिडबॉलमध्ये जे बी असते. त्यांची उष्णतेमुळे उगम शक्ती चांगली राहते.

सिडबॉल तयार करून जास्तीत जास्त लावण्याचा प्रयत्न करावा.

■ ■ ■



15

# जादुई माखला

**परमानंद रविंद्र अलोकार**
**वनरक्षक**
**मेळघाट व्याघ्र प्रकल्प**



माखला हे गाव सेमाडोह पासून उत्तर दिशेने 12 किलोमीटर अंतरावर आहे. माखला हे विदर्भातील दुसऱ्या क्रमांकाचे उंचावरील गाव असून समुद्र सपाटीपासुन अंदाजे 1150 मीटर उंचीवर वसलेले आहे. गावात एक पडका किल्ला आहे. गावाच्या आजूबाजूला बऱ्याच खोल दऱ्या आहेत. त्यापैकीच एक भूतखोरा नावाची दरी आहे, तसेच माखल्याच्या समोर 1 किलोमीटर अंतरावर खोल दरी आहे, व त्याठिकाणी लोखंडी बॅरिअर लावलेले आहेत. पावसाळ्यात त्या ठिकाणी गेल्यास धुक्यात हरवल्याचा आनंद मिळतो, तसेच माखला गावात मोहाची, आंब्यांची व जामुनांची झाडे मोठ्या प्रमाणात असल्याने, मेळघाटात व मेळघाट बाहेरही परतवाडा व धारणीला माखल्याचे आंबे व जामून प्रसिध्द आहेत, माखल्याची फळे रसाळ व स्वादिष्ट आहेत. पावसाळयात माखल्याला गेल्यास धुक्यातून जातांना जणू स्वर्गात आल्याचा फील येतो व जून महिन्याच्या शेवटच्या आठवड्यात किंवा जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यात सायंकाळी माखल्याला गेल्यास रस्त्याच्या दोन्ही बाजूला झाडांवर अप्रतिम काजवे लुकलूकतांना दिसतात, तो नजारा डोळ्यांचे पारणे फेडणारा वाटतो. तसेच माखला गावात प्रदूषण कमी असल्याने माखल्यातुन रात्री स्वच्छ आकाश दिसते. त्यामुळे मेळघाट व्याघ्र प्रकल्पामार्फत एफिल डोडो नावाने अमावसच्या रात्री आकाश निरीक्षणाचा कार्यक्रम या गावी बऱ्याच वेळेस आयोजित केला जातो व त्या कार्यक्रमास पर्यटकांचा प्रतिसाद उत्तम मिळतो. त्यामुळे मागील दोन वर्षापासून दर अमावस्येला एफिल डोडो कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहे. पावसाळा सुरू होतांना माखल्यात जामून व आंबे मोठ्या प्रमाणात असल्याने व सायंकाळी काजवे दिसत असल्याने माखला गावात जणू महोत्सव असल्याचा भास होतो. असा प्रकारे विविध प्रकारच्या फळाफुलांनी व निसर्गाने भरभरून दिलेल्या माखल्याला पावसाळ्यात गेल्यास जणू स्वर्गात आल्याचा परमानंद होतो.

16



# डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन-वन-विकास योजना

आकाश फुसे
सामाजिक समन्वयक,
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.




जंगलांचा इतिहास पाहता आपल्याला असे लक्षात येते की, वनाचे व्यवस्थापन शास्त्रोक्त पध्दतीने केले गेले आहे. वने हे केवळ महसूल गोळा करण्याचे साधन नसून निसर्गाचा अनमोल ठेवा आहे, जो मानवाचे अस्तित्व टिकून ठेवण्याकरिता अत्यंत महत्वाचे आहे. त्याकरिता वने ही राखली जावी व वनाची वृध्दी व्हावी आणि ती जोपासल्या जावी हे फक्त वन विभागाचे काम नसून या पृथ्वी तलावावरील प्रत्येक मानव प्राण्याचे दायित्व आहे. इंग्रजकालीन वन व्यवस्थापनामध्ये अधिकारी यांनी सांगितले त्या पध्दतीने गावकऱ्यांनी कामे करावी अशी पध्दत होती. त्यावेळी वना लगतच्या गावातील गावकरी हे या जंगलात मजूर म्हणून कामे करायची, त्यांचा जंगलाशी संबंध केवळ मजुरी पुरता मर्यादित करण्यात आलेला होता आणि मजूर म्हणून भुमिकाही बजावत होता आणि त्यांचा त्याना मोबदला मिळत होता.

कालांतराने १९९० च्या सुमारास परंपरेने चालत आलेल्या वन व्यवस्थापनात बदल करण्यास सुरूवात झाली व केंद्र शासनाच्या सूचना वजा विनंतीनुसार राज्य शासनाची संयुक्त वन व्यवस्थापनाची मुहर्तमेढ रोवली गेली आणि शासन पुरस्कृत विविध योजनेची आखणी करण्यात येऊन गावकऱ्यांच्या साह्याने त्या योजना राबविण्यात आल्यात. आणि याच वन व्यवस्थापनाच्या धर्तीवर ४ ऑगस्ट २०१५ च्या अधिसुचनेनुसार महाराष्ट्र शासनाने "डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना" राबविण्यास सुरूवात केली, ही योजना राज्यातील अभयारण्य, राष्ट्रीय उद्यान, व्याघ्र





प्रकल्पाचे कोअर व बफर संरक्षित क्षेत्रामध्ये जी गावे आहेत त्या गावांमध्ये टप्याटप्याने राबविण्यात येत आहे. व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील गावांचे पुनर्वसन करणे अपेक्षित नाही म्हणून अशा भागातील गावांकरिता या योजनेची आखणी करण्यात आली आहे.

जन-जल-जंगल-जमीन आणि जनावर या संसाधनाचा शाश्वत विकास साधून उत्पादकता वाढविणे. गावकऱ्यांची वनावरील निर्भरता कमी करणे, शेतीला पूरक जोडधंदे निर्माण करणे, पर्यायी रोजगार उपलब्ध करून देणे. यातून मानव वन्यप्राणी संघर्ष कमी करणे व अशा तर्हेने गावकऱ्यांच्या सहभागातून वने व वन्यजीवांचे रक्षण व व्यवस्थापनेचा दर्जा उंचावणे हा या योजने मागील उद्देश आहे. त्याच बरोबर जन-जल-जंगल-जमीन आणि जनावर या संसाधनाचा शाश्वत विकास साधून उत्पन्न मिळविणे पर्यायी रोजगारांच्या नवीन संधी वाढवून संरक्षित क्षेत्रावरील मानवी हस्तक्षेप कमी करणे संरक्षित वनक्षेत्राच्या संरक्षण व संवर्धनामध्ये ग्रामस्थांचे योगदान घेणे. मानव वन्यजीव यांच्यातील संघर्ष कमी करून सहजीवन प्रस्थापित करणे वन व वन्यजीव संवर्धनातून मिळणारे फायदे ग्रामविकासाकरिता वापरणे.

ही योजना राबविण्यात येणार असलेल्या गावांचा गाव निहाय सूक्ष्म नियोजन आराखडा तयार करून गावांचा परिस्थितीकीय विकास साधण्यासाठी सर्व विभागाच्या योजनेतील तरतुदीची सांगड घालून एकात्मिक व नियोजन बध्दरित्या विकास घडविणे हा आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पामध्ये मा. अपर प्रधान मुख्य वन संरक्षक तथा क्षेत्र संचालक मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांच्या मार्गदर्शनाखाली मेळघाटतील संरक्षित व अतिसंरक्षित अशा सर्व भागमधील गावामध्ये ही योजना राबविण्यात येत आहे. व्याघ्र प्रकल्पाच्या बफर क्षेत्रातील व संरक्षित क्षेत्रापासून २ कि.मी. असलेल्या गावांचा सहभाग निश्चित करण्यात आलेला होता, परंतु या योजनेची लोकप्रियता व उपयोगीता पाहून








महाराष्ट्र शासनाने ही योजना आता बफर क्षेत्राबाहेर (भ्रमणमार्ग) म्हणजेच वाघाचे भ्रमणमार्ग आणि कोअर क्षेत्रातून पुर्नवसित करण्यात आलेल्या गावांकरिता देखील विस्तारीत करण्यात आलेली आहे. वाघाचे भ्रमणमार्ग विस्तारीत करिण्याकरिता हे एक फार महत्वाचे पाऊल आहे.

शासन निर्णयानुसार वन लगतच्या सर्व गावांमध्ये १००% LPG पुरवठा करण्याबाबत योजिले आहे. त्याच बरोबर मानव वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी एलपीजी, बायोगॅस, सुर्यचुल, सुधारित चूल यासारख्या योजना राबविणे, गावातील महिलांना व युवकांना स्वयंरोजगारविषयी प्रशिक्षण देणे, क्षमता बांधणी करणे, रोजगारांची संधी उपलब्ध करून देणे, गौण वनउपज संकलन, मूलयवृध्दी व विक्रीस सहाय्य करणे, निसर्ग पर्यटन व गृह पर्यटनाचा विकास करणे तसेच अनुषांगीक क्षमता बांधणी करणे, प्रशिक्षण देणे, निसर्ग पर्यटन, गृह पर्यटनास चालना देणे, पशुसंसाधनांचा विकास करण्याच्या दृष्टिने समिती मार्फत दुधाळ / संकरीत जनावरे वाटप करणे, खरेदी करण्यात प्रवृत्त करणे, खाजगी क्षेत्रावर वैरण विकास, जनावरांकरिता स्टॉल फिडिंग, भाकड जनावरांचा जंगलावरील ताण कमी करणे, अनुउत्पादक वळूचे १००% खच्चीकरण करणे, पाळीव जनावरांना लसीकरण करणे इत्यादी कार्यक्रम घेण्यात येत आहे.

मेळघाट व्याघ्र प्रकल्प क्षेत्रातील गावांमध्ये जलसंसाधनांचा विकास साधण्याकरिता गावांमध्ये पाणलोट विकास कार्यक्रम राबविणे, जलमृदा संधारणाची कामे करणे, गावातील पाण्याची साठवण क्षमता वाढविणे, जलसाठयाची दुरूस्ती करणे, गाळ







काढणे, विहीर पुनर्भरण अशा प्रकारची विविध उपक्रम राबविण्यात आलेली आहे.

"डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी जन वन विकास योजना" या योजने अंर्तगत गावांमध्ये तयार केलेल्या ग्राम परिस्थितीकीय विकास समितीमार्फत विविध उपक्रम राबविल्या जाते. या समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष आणि सदस्याची निवड ग्रामसभेमार्फत केल्या जाते, तर समितीच्या सचिव पदी त्या भागातील वनरक्षक असतो आणि या समितीच्या बैठकीमधून सूक्ष्मकृती आराखडयानुसार गावातील व वन विकासाची कामे केली जातात.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पात येणाऱ्या गुगामल वन्यजीव विभाग, सिपना वन्यजीव विभाग, आकोट वन्यजीव विभाग, अकोला वन्यजीव विभाग, मेळघाट वन्यजीव विभाग, टिपेश्वर वन्यजीव विभाग या सर्व विभागात ही योजना राबवून व्याघ्र प्रकल्प, राष्ट्रीय उद्यान व अभयारण्य क्षेत्रातील गावांना मोठया प्रमाणात फायदा झालेला आहे. गावातील जन-जल-जंगल-जमीन-जनावर या संसाधनांचा शाश्वत विकास साधून, उत्पादन/ उत्पादकता पर्यायी रोजगाराच्या नवीन संधी वाढविणे, संरक्षित क्षेत्राचे संरक्षण व संवर्धनामध्ये ग्रामस्थांचे योगदान मिळाले आहे. या सर्व उपक्रमाव्दारे मानव वन्यजीव यातील संघर्ष कमी करून सहजीवन प्रस्थापित करण्यास मदत झालेली आहे.

ही सर्व योजना राबवितांना मा. रेड्डी संराच्या (APCCF&FD) मार्गदर्शना खाली सर्व विभागात कार्यशाळा घेण्यात आल्यात. सर्व विभागातील अधिकारी यांनी आपले योगदान ही योजना राबविण्यासाठी दिलेले आहे, विशेष म्हणजे सर्व गावातील गावकऱ्यांनी सुध्दा या योजनेचे स्वागत करून आपल्या गाव व परिसरातील वन क्षेत्रात योग्य प्रकारे ही योजना राबवित आहे.





# गोनी शहानुरचे मचाण

**दिपक जोशी**
पक्षीमित्र,
माजी मानद, वन्यजीवरक्षक, अकोला



जंगल आणि वन्यजीव याविषयीचे माझे आकर्षण माझ्या जीवनातील एक आनंदी आणि स्फूर्तीदायी आठवणींचे भांडार आहे. जेव्हा जेव्हा मला मोकळा वेळ मिळतो तेव्हा तेव्हा मीया आठवणींना उजाळा देतो. त्यातुन नवीन उर्जा घेऊन उत्साहाने कामाला लागतो. जसा नियमित व्यायाम आपले शरीरतंदुरूस्त आणि निरोगी ठेवतोत सा निसर्गाचा सहवास आपल्या मनाला ताजेतवाने राहण्यास उपयोगीपड तो. असामाझा अनुभव आहे. व्याघ्र मेलच्या निमित्ताने मला अशीच एक घटना आपणास सगळयांना कथन करायची संधी मिळते आहे. याचा मला विशेष आनंद होतोय.

१९९८ पासून मी बुध्द पौर्णिमेच्या रात्री मचाणावर बसून वन्यप्राणी गणनेचा आनंद लुटतोय. काटेपुर्णा अभयारण्यापासुन माझी सुरूवात झाली. ते व्हा ज्ञानगंगा, पैनगंगा आणि काटेपुर्णा अकोला वन्यजीव विभागाचे अखत्यारीत होता. ह्या तिन्ही ठिकाणी मचाणावर बसुन झाल्यावर ताडोबा, नागझिरा, पेंच, मेळघाटातील विविध पाणवठ्यांवरील अत्यंत रोमांचकारी, अंगावर शहारे आणणारे प्रसंग भय निर्माण करणारे क्षणांची मी अनुभूती मी घेतली. "पुढच्या वर्षी गणनेला नाही थयायचेरे बुवा" असा फुसका निश्चय करून पुन्हा बुध्द पौर्णिमा आलीकी माझे पाय परत उत्साहाने जंगलाकडे वळायचे. या अनुभवांपैकीच एक प्रसंग मी सांगतोय.

अकोट वन्यजीव विभागाच्या नरनाळा अभयारण्यातील गोनी शहानुर बीट मधील २००४ च्या वन्यप्राणी गणनेतील हा प्रसंग आहे. त्यादिवशी मी आणि अकोल्यातील माझे मित्र नामांकित शल्य चिकित्सक डॉ. मिलिंद चोखंडे आम्ही दोघे सकाळी १०.३० वाजता शहानुरला हजर झालो. बरेच हौसी निसर्गप्रेमी उत्साहाने तेथे



हजर होते. आता जसा टिफीन, पाण्याची सोय, नाश्ता वन विभाग उपलब्ध करून देते तेव्हा तशी व्यवस्था नव्हती. आम्ही शिदोरी, पाण्याची वयन, पाठीवर हँवरसँक अशाल वाजम्यासह कोठल्या मचाणावर आपला नंबर लागतो. ह्याची उत्कंठतेने वाट बघत होतो. १२.३० वाजता आम्हाला गोनी शहानुरची चिठ्ठी हातात पडली. एका वाहनामध्ये आणखी काही हौशी मंडळीना घेऊन आम्हा लोकांना नात्यांच्या त्यांच्या मचाणावर सोडण्यात आले. उन्हाचा तडका जबरदस्त होता. घामाच्या धारा अंगावर चहू बाजूंशी शिवाशिवीचा खेळ खेळत होत्या. एका तीन फुट जाडीचा बुंधा असलेल्या चिंचेच्या वृक्षावर आमचे मचाण होते. अंदाजे १५, १६ फुट उंचावर. मचाणापासुन सुमारे ३५, ४० फुट अंतरावर कृत्रिम पाणवठा होता.

बहुधा सकाळीच टँकर व्दारा त्यामध्ये भरपुर पाणी सोडले असावे कारण एका ठिकाणी खुप पाणी सांडलेले दिसत होते. आजुबाजुला घनदाट झाडी मनाला वेगळेच काही संकेत देत होती. तो परिसर बघून आम्ही खुश झालो. आज आपल्याला "आनंदाची लॉटरी" लागणार अशी विचारांची गाजरे खात आम्ही मचाणावर स्थानापन्न झालो. स्थिर स्थावर झाल्यावर आमची नजर चोहो बाजूंनी भिरभरू लागली. मैना, सातभाई, बुलबुल, कोतवाल, खाटीक, भांगपाडी, वेडेराघु, पोपट याव्दिजगणांनी एका मागोमाग एक अशी हजेरी लावली. टिट, स्वर्गीयनर्तक, टकाचोर, सहेली, सुभग, हळद्याया मंडळीनी जणु काही आपण विशेष पाहुणे आहोत या अविर्भावात आमच्या उपस्थितीची नाराजीने दखल घेतली. ह्या मंडळींच्या आगमनाने आम्ही पुलंकित झालो होतो. थोडया वेळाने आम्ही जेवण केले. उन्हाचे रट्टे खात, तोंडाला कुलूप लावून आम्ही आमचे निरिक्षण सुरू ठेवले. जंगलात बारीक बारीक चिलटं, माश्या, मधमाशा मुंग्या यांचा उपद्रव बर्यापैकी मनाची स्वस्थता बिघडवतात हे मी माझ्या अनुभवांवरून शिकलो होतो. म्हणून मी मच्छरदाणीच्या कापडाचा दुपट्टयाच्या आकाराचा तुकडा माझ्या स्यकमध्ये ठेवत असतो तो तोंडाला गुंडाळून आम्ही "वेट अँडवॉच" हे तत्व वापरून मौनव्रत धारण करून बसलो. साधारण ३ च्या सुमारास वानरांचा म्होरक्या मोठ्या सावधगिरीने पाणवठयावर आला. त्याने सगळीकडे नजर फिरवून एक विशिष्ट प्रकारचा आवाज दिला तो ऐकताच काही बारकी पिल्ले ४,५ माद्यांसह भरभर आल्या. आधी म्होरक्या पाणी प्यायला, त्यानंतर इतर पाणी प्यायले मग त्याच्या मर्कटलिला सुरू झाल्या. त्या पाहण्यात आमचे चांगलेच मनोरंजन झाले. एकाएकी म्होरक्याने इशारा दिला तशी अवघी टोळी पसार झाली. घामामुळे माश्या, चिलटं फार त्रस्त करित होते. तेवढयात एक सोनपाठी सुतार कर्कश्श आवाज करित समोरच्या झाडावर स्थिरावला, समोर हरियल पक्षांचा एक थवा हळुच पाण्यावर उतरला. त्यांचे रूप पाहून आम्ही तर अचंबित झालो. हत्तीच्या पावलांनी दिवस पुढे सरकत होता. ६, ६.३० च्या सुमारास आम्ही लघवीसाठी खाली उतरलो, (होमग



अंधारात खाली उतरायला चाचरते) मचाणापासुन अंदाजे २५ फुट लांब जाऊन मी लघवी करून मचाणावर येऊन बसलो. माझ्यानंतर डॉ. जाऊन आले आणि मचाणावर चढण्यासाठी जी शिडी होती त्या शिडीच्या तिसर्या पायरीवर ते चढलेत तितक्यात एक अस्वल जोराने ओरडत आमच्या मचाणाकडे अगदी त्वेषाने आले. समय सूचकता दाखवत डॉ. पटकन मचाणावर चढले. मग ते अस्वल आमच्या मचाणा भोवती आरडा ओरडाकरिता फिरले. त्याचा आवाज ऐकून दुसरे अस्वल ओरडत आले. आमची तर पाचावर धारण बसली, कुठले ही बचावाचे साधन आमच्या जवळ नव्हते. दोन्ही अस्वलांनी तर आमचा खिमा करून टाकला असता कारण कोणत्याही झाडावर चढून ते आपले इप्सित सहज साध्य करतात., लांबलांबते ही टोकदार नखांनीते आमची चांगली चचिरफाड करू शकले असते. पण आमचे नशीब जोरावर होते ते मचाणावर चढले नाही. थोड्या वेळ मचाणाखाली थांबुन दोघेही जंगलात निघुन गेले.

आमचे नशिब जोरावर होते म्हणून आम्ही वाचलो. अन्यथा काही खरे नव्हते. एका जबरदस्तजीव घेण्या प्रसंगातून आम्ही बचावलो. माझे दैवत श्री गजानन महाराज यांच्या कृपेमुळे आम्ही सुखरूप वाचलो असे मी मानतो. त्या दहशतीच्या दडपणातून बाहेर पडायला आम्हाला रानकोंबड्याचे ओरडणे सहाय्यभूत ठरले. तो पर्यंत अंधाराचीचा दर जंगलावर पसरायला सुरूवात झाली होती. वारा वाहणे थांबले होते. अंगावरचे शर्ट काढून आम्ही पेपर नेह वाघेत होतो. १.५, २ तासाने चंद्र अवतरला, आम्ही पाणवठ्यावर डोळे लावून तेथील हालचाली टिपायला लागलो. विविध आवाजांची संगीत स्पर्धा सुरू झाली. त्यामध्ये रातवा, टिटव्या, घुबड, रातकिडे, मोर, सांबर ह्यांचा सहभाग होता. त्यानंतर रात्री एक, दिडच्या सुमाराला बिबट्याचे पाणी पिण्यासाठी आगमन झाले. चंद्र प्रकाशात आम्ही प्रथमच या देखण्या श्वापदाला पाहता होतो. आमच्या मनात क्षणभर भितीची घंटा निनादली. पण पाणी पिऊन डौलदारपणे चालत त्याने जंगलाची वाट धरली. आम्ही वाघाच्या वाटेकडे डोळे लावून बसलो होतो त्याने मात्र निराशा केली. मग पहाटे दयाळ, कोकिळ, बुलबुल टिटयांचे गायनाने आमची सकाळ आल्हाददायक केली. तेवढ्यात मुंगुसाचे युगुल खाण्याची शोध मोहिम करण्यात इकडेतिकडे फिरायला आलेले दिसले. वन विभागाने दिलेला एक फॉर्म भरून त्यांच्या हाती सुपुर्द करून आम्ही परतीच्या प्रवासाला लागलो.



■ ■ ■



18

# मेळघाट स्वर्गीय सौंदर्याची खाण

**मीना जाधव**
मुंबई



मेळघाट जंगलात इतकं अतुलनीय आणि अद्‌भुत सौंदर्य दडलेले आहे. डोळयांची पारणे फेडण्यापलीकडचे, आपल्या नजरेत गुंतत जाणारे, विहंगम सौंदर्य! बघताच प्रेमात पाडणारं... मनाचे कवाडं उघडून भुरळ घालणारं. मेळघाटचे जंगल म्हणजे जन्नत! ह्याची सुरूवात होते ती... बोरी गुल्लरघाट धारगड सफारी, फुल वन डे सफारी, नाईट सफारी... मचाण थ्रील, बर्ड वॉचिंग, ट्रेकिंग... पावसाळयातला कॅम्प... निसर्ग अनुभव.

जंगल भटकंतीचे वेध लागले की कधी एकदा मेळघाटमध्ये जावू अशी तळमळ सुरू होते. जंगलाचा आवाज... जंगलात रम्य पहाटे फिरताना जंगल गंधाने वेडावून टाकते, सुख सुख म्हणजे काय? मनाला शितल सुखावणारे वातावरण, जे निसर्गाच्या सान्निध्यात मिळते. आयुष्य किती तरी पटीने वाढल्यासारखे वाटते. जंगलात नवनवीन शोध घेण्याचा मनोमन निच्श्रय केला असेल आणि भंटकंती करायची ठरवले असेल, जैवविविधतेने संपन्न निसर्ग अनुभव घ्यायचे ठरवले असेल तर मेळघाटला जायला हवं.

निसर्गाने निर्माण केलेल्या सौंदर्याचे अनुभव साठवून शांत बसून राहिले तरी इथे माणूस हरवून जातो. सकाळच्या वेळी दवबिंदूनी पानोपानी मोती लगडले आहेत असा भास होतो. पहाटे जाग येते तेव्हा सूर्यकिरणांच्या सोनेरी किरणांनी...

धुक्यात वेगळीच प्रसन्नता आणलेली असते, पक्षी गाताना जणूकाही निसर्ग गातो आहे गाणे... असा अनुभव येतो. एक प्रकारे स्वतःला विसरून पूर्णपणे जंगलमय होणे. ही जंगलाची धुंदी, नजारा, गंध, गाद सतत या जंगलाच्या प्रेमात पडलेले... जणू जंगल जगणे, जंगलच जीवन, हे गाणे वेगळेच असते. या जंगलाचा मोह ज्याला जडला तो मेळघाट शिवाय जगू शकत नाहीत... असे जगणे म्हणजे ऑक्सिजन शिवाय श्वास... जंगल आणि मी 'तल्लीनता' ती हीच की काय? ह्याची मेळघाट मध्ये जाणिव झाली.

नवनवीन जंगल अनुभवायला मेळघाटच्या जंगलात... सृष्टीचा कणं कण... प्रत्येक ऋतुचा एक वेगळा सोहळा... जणूकाही उत्सव भरलेला असतो. मेळघाट मध्ये निसर्ग वाटा धुंडाळताना अनपेक्षित काही नजरेत भरतं... आपण गुंततो, आणि



उत्सुकता स्वस्थ बसू देत नाही. मग सुरू होते शोध मोहीम... जंगलात कधी आणि कसे, काय घडेल हे अकलिपत असते. पण वरवर शांत भासणारं जंगल... रोज नव्याने सामोरे येते. एक निसर्ग प्रेमी जंगलावर आणि त्यातील प्रत्येक घटकावर नितांत प्रेम करतो.

मेळघाट मध्ये ही जबाबदारी ओळखून वन विभागाने जंगलाचे रक्षण करत कठीण काळातही अतिशय स्तुत्यच उपक्रम राबविण्यात यश मिळवले आहे. मेळघाट व्याघ्र प्रकल्प, जैवविविधतेने परिपूर्ण आहे. अति दुर्गम भागात कोणत्याही प्रकारची सुविधा उपलब्ध नसतानाही वन कर्मचारी व वरिष्ठ अधिकारी फार परिश्रम घेवून जंगलाचे रक्षण अत्यंत बारकाईने करण्यासाठी सदैव तत्पर असतात. हे वनयोध्दे वन आणि वन्यजीव जंगल सुरक्षित ठेवून एक प्रकारे सामान्य माणसाचे भविष्य संरक्षित करत आहेत.

ऋतू जसे जसे बदलत जातात तसे जंगलाचे स्वरूप मेळघाट मध्ये बदललेले पहायला मिळते. पावसाच्या दिवसात जंगल मस्त हिरवे पोपटी धुमारे लेवून... जणूकाही हिरवा शालू पांघरून, ह्या हिरव्या रंगाची जादू काही औरच... चिंब भिजून ओथंबलेल्या प्राण्यां-पक्षांनसाठी नवतरूणी रूप घेवून, तर वसंताची चाहूल लागताच पिवळसर केसरीसर, मंद वार्याबरोबर येणारा मोहक सुगंधाने वेडावणारे, रविराजांच्या प्रखर तेजाने मेळघाट फुलून येतो. पळस, बहावा, पांगारा फुलतात, फुलवतात त्यांच्या रूपाने जंगलात उब संचारते. तर थंडीत धुक्याची शाल पांघरून सकाळच्या सूर्य किरणांत दवबिंदूसह अजूनच मोहक, गूढ, अनाकनीय तरीही तेवढेच आकर्षक वाटते. प्रत्येक ऋतूचे सौंदर्याचे वैभव मेळघाट मध्येच अनुभवायला मिळते.

हा जंगलाचा छंद फार अनोखा असतो. वन्यजीवांचे, झाडांचे, पाना फुलांचे, एवढेच नाही तर काही जंगलाचे आकर्षण मनात कधी घर करून बसले हे आपल्याला कळत नाही. आणि पाय आपोआप मेळघाट जंगलाकडे वळतात, पुन्हा पुन्हा जात रहावेसे वाटते. जंगलाचा गंध मनात दरवळला की मेळघाटची ओढ लागते. पानांची सळसळ, विविध पक्षांचे प्राण्यांचे आवाज कानात अमृत ओतल्यासारखा बोलवायला लागतात, असे हे 'मेळघाट' चे भरगच्च घनदाट जंगल, त्या बरोबरच, गवताळही, मधेच काही ठिकाणी निसर्गाने निर्माण केलेला दगडाळ भाग, तसेच डोंगर-दर्यांनी नद्या नाल्यांनी समृध्द अशी ही परिपूर्ण परिसंस्था. भरगच्च अशी इथली जैवविविधता समृध्द आहे. निसर्ग जंगलातील जीवन अबाधित ठेवतो त्याचे उत्तम उदाहरण म्हणजे मेळघाट. तसेच काही ठिकाणी इथे उघडे माळरान ही जंगल वाटेवर आहेत. अशा वेळी एक अनामिक ओढीने जंगलाकडे







जायला निघाले की फूटभर वाढलेल्या गवतातही वाटे वरून बर्याचदा जातानाच इथे तूम्हाला काही तरी बघायला मिळतेच ह्याची हमी. इथे लालपंखी होला (Red collared dove) त्यानंतर अनेक प्रकारचे चंडोल. चिमण्यांच्या थवा, खुरट्या गवतावर उडणारे अनेक प्रकारचे नाकतोडे, फुलपाखरे, छोटे छोट्या थव्याने येवून गवताच्या बियांवर तूटून पडणाऱ्या माळ मुनिया, त्यांच्या वर टपून असलेले आकाशातील शिकारी पक्षी,... हे बघतांना देहभान विसरायला होत. चितळांचे कळप आणि त्यांच्या म्होरक्या मॉडेलिंगच्या पोझमध्ये, हरणाचे कळप त्यांच्या मोहक हालचाली त्यातील सावधानता... हरणे खूप हुशार असतात... ते माकडांचा आवाज (कॉलिंग) वाघ, बिबट्या जवळ पास असल्याचे बरोबर ओळखतात. त्यावेळेस त्यांच्या डोळ्यातली मूर्ती मंत भिती आपल्याला मंत्रमुग्ध करते. मधेच मोर आपल्या लांडोरला लूभावण्यासाठी पिसारा फुलवून नाचताना दिसतो. आणि ह्यात भर म्हणून की काय तूरू तूरू चालत गवत बिया टिपणारी पाखूर्डी, कधी योग आला तर दिसतात. अगदी बेमालूम पणे वावरत असतात. ह्या मोकळया रानावर. पण आपल्याला त्या दिसत नाहीत. पण जसे ही जवळ जाऊ त्या अशा भुर्कन उडतात. ह्यांना बघण्यासाठी नजरेच एक कौशल्य प्राप्त व्हावे लागते. एवढे मात्र निश्चित. तसेच माळ टिटवा ही फार कमी दिसणारा पक्षी, पण इथे दिसते. दिसली कि जोडीने दिसतात. टिव टिव करत उंच झेप घेतात. हवेत कसरती करतात, आरडाओरडा करत परत जमिनीवर येतात, दोघेही जणूकाही लुटूपुटूची लढाई करत असतात, पंखाचा पिसारा फुलवतात व आपल्याला अगदी थक्क करतात. पक्षांच्या ह्या आनंदात आपल्याला सहभाग मिळणे म्हणजे अहो भाग्य. थोर नशीबच हवे असे नयनरम्य विहंगम दृष्य पहायला... निसर्गाच्या सहवासात गेले कि कळते, आनंदाची व्याख्या काय आहे हे मात्र खरे. जंगल वाटेवर आपले स्वागत करत आपल्या पुढे तूरू तूरू चालत राखी तित्तर झाडांमधून लपंडाव खेळताना दिसतो. सकाळ सकाळी आपल्या मोहक आवाजाने गाणे गणारे तित्तर (Francolin) जवळ जावू तसे पळत सुटतात. त्याची मैफल कान तृप्त करतात... ज्या अनामिक ओढीने आपण मेळघाट मध्ये येतो तो जंगलाचा राजा वाघ गवताच्या सळसळत्या पात्या आडून बेमालूम पणे आणि तरीही आपल्या हालचालींचा कानोसा घेत असणारा दृष्टी क्षेपात येतो नि आपल्याला स्वर्ग दोन बोटे की काय अवस्था होते... अस्वस्थ शांतता... जिप्सीच्या थबकलेल्या टायरला कळत असते तर थरथरेल असे राजबिंडा सोनेरी असा वाघ आपल्या नजरेसमोर... अलौकिक सुखद धक्का



असतो. खरे तर हा हिंस्र प्राणी पण आपण पटकन त्याच्या प्रेमात पडतो. मेळघाटाचा हा देखणा ढाण्या जिप्सीतून खाली उतरून मुका घ्यावा इतका रूबाबदार... आपल्याला का वेडावतो हे कळण्याची सुध्दा शुध्द राहत नाही.

मेळघाट मध्ये वसंत ऋतू म्हणजे

अनेक वृक्ष, वेली फुलायचे दिवस बहरण्याचे एक वेगळाच सुगंध आसमंतात पसरलेला जाणवतो. मधमाशा, बुलबुल, रान चिमण्या... किती नी काय शब्द अपुरे पडतात.

तोच जंगली मांजर (Jungle cat) सकाळच्या कोवळया उन्हात शिकारीची तयारी म्हणून की काय अंगाची सफाई करताना दिसते. जंगल जंगल करतांना मेळघाटचे जंगल अनाहूत पणे आपल्या मनाला स्पर्शून गेलंय... आणि एक वेगळीच प्रसन्नता निर्माण झाल्याचे जाणवतं... सत्व हरवून प्रेमात पडल्याचा... नरजेत एक वेगळीच नशा निर्माण झाल्याची... जंगलाची एक अनामिक ओढ... मेळघाटची जंगल भटकंतीची ओढ लागल्याची जाणीव होते... ही ओढ जंगलात भटकंती करायला लावते. ह्या शोध नजरेने निसर्गात एकरूप झालेला रान पिंगळा (Jungle owlet) अचानक समोर दिसतो आणि आपण त्याच्या नजरेत गुंततो. इतका सुंदर पक्षी... जसा अचानक दिसतो तसा बघता बघता नाहिसा होतो. खरे सांगायचे तर वन्यजीवांच्या शोधात कधी कधी खुप भटकंती केल्यावर ही काहीच दिसत नाही, आणि कधी लॉटरी लागल्यासारखं समोर अचानक प्रकट होतील सांगता येणार नाही. परंतु जंगल तुम्हाला कधी निराश करत नाही. आणि त्यात तुमचे नशिब बलवत्तर असेल तर जंगली कुत्रे (ढोले)... ह्याचा कळप पूर्ण पणे म्होरक्याच्या नेतृत्वाखाली कुणालाही न जुमानता येतो, तसे ते जणूकाही सतत शिकारी साठी पळतांना दिसतात. खूपच क्वचीत एखादा बसलेला पाहायला मिळतो.

क्षितिजावर डोंगराच्या कडांवर सोनेरी किरणांनी झालर तयार करत लालबुंद रविराज आगमन करत असतानाच सौंदर्य अवर्णनय असते. जगातले सगळ्यात मोठे नशिबवान आपणच आहोत जाणीव होते. मन प्रसन्न होतं. वन्यजीवांच्या सहवासात अद्भुत घटना आपल्याला पहायला, अनुभवायला मिळतात. स्वप्नातही विचार करत नसेल असे थरारक अनुभव येतात.

मेळघाट हे जणू अस्वलांचे माहेरघर... कारण इथे त्यांना लागणारे मुबलक वृक्ष संपदा आणि हवामान. अस्वल नेहमी आपल्या धुंदीत फिरत असते... फूलं, फळे, मधाचा मागोवा घेत... मादी असेल तर पाठीवर पिल्लांना घेवून जाताना दर्शन होते आणि आपण स्तब्ध होतो. अस्वलांचे





स्वभाव कळत नाही. कधी कधी असुरक्षितेच्या भावनेतून ते माणसांवर हल्ला करतात. त्यामुळे सावधता बाळगून वाटचाल करावी लागते. मधेच एखादा सांबरांचा कळप बघता बघता अदृश्य होतो. पुढं काही अंतरावर मस्त मोठा (Indian gaur) गौर चा कळप मुखीयाच्या नेतृत्वाखाली चरताना दिसतो. उद-मांजर हळूहळू रस्ता ओलांडत असताना अचानक समोर आलेले दिसते. जवळच्या पाणवठयावर नाचन (Fantail)... रॉबीन... त्याचबरोबर किंगफिशर आपले मासेमारीचे कौशल्य दाखवत असतो. निसर्गाचा हा अद्‌भुत चमत्कार इथे बघायला मिळतो. आपल्या इतके भाग्यवान आपणच असे निसर्गाशी एकरूप होऊन आपल्याच अंतर्मनाचा अनुभव घेता येतो. बिबट्या हा अतिशय हुशार प्राणी, सभोवतालच्या वातावरणाशी बेमालूम पणे मिसळून त्यांनी वाघांबरोबर आपले अस्तित्व टिकवून ठेवले आहे. त्याची पिल्ले अतिशय हुशार व आपल्या आईने शिकवल्या प्रमाणे वाढतात, जगतात. बिबट्याचे दर्शन म्हणजे तुमच्या संयमाची परिक्षा असते. इथे रानडुक्करे खूप मोठ्या प्रमाणावर दिसतात सावध असले तरी थोडे बिनधास्त वावरतांना दिसतात. खवल्या मांजर ही आपले नशिब आजमावते.

टिटवी, खाटीक, निलीमा, नाचरा, पिवळ्या कंठाची चिमणी, लावे, पोपट, मोर, सोबतच कामर्या ढोक आणि मधुबाज यासारखे पक्षी आपल्या सौंदर्याची मोहाणी घालतात. तर वाघ, बिबट्या, अस्वली, रानमांजर, उद मांजर, जंगली कुत्रे, रानडुक्कर, चितळ हरणं, सांबर, गौर, भूंकणारे हरिण इ. जैवविविधतेने समृध्द असा अनुभव मेळघाट मध्ये येतो.

झाडांची तर किती विविधता साग, बांबू, आजन, खैर, पळस, पांगारा, तेंदू, ऐन, धावडा वगैरे नेहमीची झाडं. चारोळी, माहावृक, मोहा आणि इतरही नवनवीन झाडं. रानगवत, रानफुलं असं एक समृध्द जंगल म्हणजे मेळघाट.

कुठं आणि काय, कसे जंगल अनुभवणे हे महत्वाचे. शांत पणे प्राणी व पक्षी त्याचा संवाद, वावर, मंद वाऱ्या बरोबर येणारा मोहक सुगंध जंगलात खूपच आनंद देतो केवळ वाघाच दर्शन म्हणजे जंगल भ्रमंती नव्हे...

पावसाळयात तर मेळघाटचे सौंदर्य पाहून मेळघाट हा धरतीवरील स्वर्ग असल्याचा प्रत्यय येतो. जणूकाही धुक्याची शाल लेऊन हिरव्यागार झाडांमधून पांढरा शुभ्र दूधसागर कोसळावा अशी निसर्गाची मुक्त उधळण इथे अनुभवायला मिळते. त्यातलाच एक सुलई धबधबा... धबधब्यांखाली... मनसोक्त चिंब भिजताना निसर्गाच्या शक्तीचा साक्षात्कार झाल्याचा अनुभव येतो.





# जादूई मेळघाट

**अपेक्षा तरजुले**
**MSTrIPES TEAM**
मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.



Lockdown मुळे मेळघाटला जाण्याचा योग बरेच दिवसापासून येत नव्हता व मेळघाटचे निसर्ग सौंदर्य सारखे खुणावत होते व मी आतुरतेने मेळघाटला जाण्यासाठी संधी शोधत होते. आठवड्याच्या प्रत्येक मंगळवारी MSTrIPES डाटा जमा करण्याकरिता आमच्या टीममधील सदस्य कोहा जात असतात व तेथील निसर्ग सौंदर्याची वन्यजीवांची माहिती सांगत असे, त्यामुळे कोहाबद्दल एक आकर्षण निर्माण झाले होते व तिथे जाण्याची उत्सुकता होतीच. एप्रिल महिन्यात काही कामानिमित्य मी व माझे सोबती गजानन धाडसे आणि निखिल काळे परतवाडा येथून कोहाला जाण्याकरिता निघालो. बरेच दिवसानंतर जंगलात जाण्याचा आनंदच वेगळा होता. दुपारी १२ च्या सुमारास आम्ही कोहा येथे पोहचलो. नेहमीप्रमाणे MSTrIPES डाटा जमाकरून झाल्यावर आम्ही वनपाल श्री. बुन्धाडे सर यांच्या सोबत त्यांनी तयार केलेले पाणवठे पाहण्यास ढलाट्या वर्तुळामध्ये निघालो. जंगलात नुकताच ४ ते ५ दिवसापूर्वी पाऊस येऊन गेला होता. पावसानंतरच जंगल फारच मनमोहक वाटत होत. मेळघाटचे निसर्ग सौंदर्य बघून बाकी सर्व गोष्टींचा विसरच पडला होता. जातांना गाडीच्या समोरून उडून जाणारे सुंदर पक्षी जणू काही आमच्या स्वागतासाठी हजर होते. सोबत असलेले बुन्धाडे सर हे आम्हाला त्यांचे जंगलातील अनुभव सांगत होते. आम्ही पाणवठयावर पोहचलो तिथे असलेल्या बोअरवेलचे थंड आणि स्वच्छ पाणी पाणवठ्यामध्ये जमा होत होते.

मी सुध्दा त्या थंड पाण्याचा आनंद घेतला. तहान लागलेली असल्यामुळे पाणी मला अमृतच वाटले. जंगलातील शांतता आणि पक्ष्यांचा आवाज हे मनाला आनंद देऊन गेले. चालत असतांना वाटेवरच आम्हाला मोर आणि भेडकी यांचे दर्शन लाभले. हे सर्व अनुभवुन आणि बुन्धाडे सरांना कोहा कॅम्पला सोडून आम्ही तारूबांधा मार्गाने जंगलाचा आस्वाद घेत परत निघालो. हरिसाल ते सेमाडोह रोडवर असलेल्या भोपळा नाल्यामध्ये आम्हाला एक अस्वल मनसोक्त फिरताना दिसले. २० ते २५ मिनिटे ते अस्वल तिथेच मनसोक्त फिरत होते.







मेळघाट मध्ये अस्वल पाहण्याचा आनंदच वेगळाच होता. या वेळी मी पहिल्यांदाच अस्वल पहिले होते. त्यामुळे माझ्यासाठी हा अनुभव अविस्मरणीय होता. ज्या झाडाखाली अस्वल फिरत होते तिथेच वरती झाडावर मोठा तुरेवाला सर्पगरूड बसलेला दिसला. एकाच वेळी एकाच ठिकणी २ वन्यजीव दिसल्याचा आनंद आमच्या चेहऱ्यावर झळकत होता. प्रवास पुन्हा सुरु करून आम्ही थोडं समोर आलो आम्हाला रस्त्यावर कोलकास चे बोर्ड दिसले त्यावरचे हत्ती बघुन आम्ही कोलकास कडे गाडी वळवली.

कोलकास येथे वनपाल श्री. सोळंके सर यांची भेट झाली. सरांसोबत बोलत असतांनाच सामाजिक अंतर ठेवून नियमांचे पालन करीत हत्ती आपली गस्त करून एकापाठोपाठ एक असे येत होते. त्यांना बघताच मनात विचार आला आजकाल माणसांपेक्षा प्राणीच जास्त जबाबदारीने वागतात. हे सर्व विचार मनात घेऊन आम्ही वरच्या रेस्ट हाऊस ला जायला निघालो. तेवढयात मधेच मोर पिसारा फुलवून नाचतांना दिसला त्याच्या सोबतीला लांडोर पण होते. आम्ही गाडी थांबवून तो नजारा १५ ते २० मिनिटे पहिला.

असे सर्व मेळघाटचे सौंदर्य डोळ्यात सामावून आम्ही परतीची वाट धरली.

या प्रवासामध्ये Lockdown च्या काळात वन्य प्राण्यांना मोकळ फिरता आले. असे वाटतेय की जंगलामध्ये Lockdown आयुष्यभर असेच राहावे.



■ ■ ■

# लोक सहभागातून वन संवर्धन

मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती.

मेळघाट व्याघ्र प्रकल्पातील अधोरेखीत असलेल्या मेळघाट वन्यजीव विभागामार्फत अंगार मुक्त जंगल स्पर्धेचे बक्षीस वाटप करण्यात आले व कुरण विकास उपक्रमाचे उद्घाटन मा. आमदार श्री. राजकुमार पटेल यांच्या हस्ते करण्यात आले.

गुगामल वन्यजीव विभागामार्फत पुर्नवसीत मांगीया (शिरजगांव कसबा) येथे मा. आमदार श्री. राजकुमार पटेल यांच्या हस्ते स्थानिकांना प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र वाटप करण्यात आले व तसेच स्थानिक महिलांना स्वयं:रोजगार उपलब्ध व्हावा म्हणून शिलाई मशिन केंद्र सुरू करण्यात आले.
















# 21 Events & press note



अमरावती, शुक्रवार, ११ सितंबर २०२० | ५

## वनव्याघ्र प्रकल्प शहीद दिवस मनाया

### वन शहीद अमर रहे के नारे गूंजे

संवाददाता, ११ सितंबर

चिखलदरा- पर्यटन नगरी चिखलदरा में वन व्याघ्र प्रकल्प शहीद दिवस मनाया गया। चिखलदरा में शहीदों की याद में हर साल शहीद दिवस मनाया जाता है। वनों को, वन्यजीवों की पर्यायी स्वरूप में पर्यावरण की सुरक्षार्थ अनेक वनअधिकारी, कर्मचारी, वनमजदूर आदि ने अपने प्राणों की आहुतियां देकर वनों का व वन्यजीवों की सुरक्षा की है। आज भी खनन माफीया, शिकारी, अतिक्रमण माफिया, जंगल माफिया की ओर से वन कर्मचारियों पर दिनों दिन हमले की घटनाएं बढ़ती जा रही है।

शहीद दिवस के परिप्रेक्ष में वनों की सुरक्षा हेतु सर्वोच्च बलिदान की घटना राजस्थान जोधपुर स्थित खेजडी गांव में घटी थी। इस घटना में वन की सुरक्षा करते समय कुल ३६३ स्त्री-पुरुष शहीद हो गए थे। इसी घटना के स्मरणार्थ भारत सरकार ने ७ मई २०१३ को मान्यता दी तथा ११ सितंबर को वन शहीद दिवस के रुप में घोषित किया और तभी से शहीदों की याद में प्रति वर्ष ११ सितंबर को शहीद दिवस मनाया जाता है।

चिखलदरा में आयोजित वन शहीद दिवस कार्यक्रम में डीएफओ विनोद शिवकुमार, नवकिशोर रेड्डी, पियुषा जगताप, आर.के.पटवारी, आरएफओ प्रफुल ठाकरे, डॉ. मयुर भेलुमे, आरओ डी.एस.सावले, यु.एल.मकेश्वर, वाहने, खेरडे, वनरक्षक प्रकाश शनवारे, एस.एम.राठोड, एस.आर.पांडे, ए.एम.आठवे, गहरे, गंगा कास्देकर, एसटीपीएफ कर्मचारी सहित संयुक्त वन व्यवस्थापक समिति, खटकाली के अध्यक्ष, सचिव तथा सभी सदस्य रांधे मनोहर जांभेकर, मनाजी बुडा कास्देकर आदि उपस्थित थे।

## वन शहीदांना समर्पित








# 22 Newspaper coverage

मेळघाट व्याघ्र प्रकल्प,
अमरावती.



लोकमत

Hello Washim
Page No. 1 May 22, 2020
Powered by: erelego.com

## सोहळ अभयारण्यात रुजली जैवविविधता!

### पर्यटनस्थळी पक्ष्यांची किलबिल

जागतिक जैवविविधता दिन

लोकमत न्यूज नेटवर्क



लोकमत

Hello Khamgaon
Page No. 1 Jul 09, 2020
Powered by: erelego.com

## 'ज्ञानगंगा'मध्ये वन पर्यटनास प्रारंभ; बोटींगचीही सुविधा होणार उपलब्ध!

मुक्कामही करता येणार : अस्वलांसाठी प्रसिद्ध असलेल्या ज्ञानगंगा अभयारण्यात आहेत ४८ प्रकारची फुलपाखरे

लोकमत न्यूज नेटवर्क

### कोरोना संकटकाळात अर्थकारणालाही हातभार

# Water conservation, voluntary relocation game changer for MTR

## Over 1.7k Ha Farm Land Turns Into Lush Green Meadows

Vijay.Pinjarkar@timesgroup.com

Pics: Ranjit Deshmukh



Water is the most prevalent limiting factor after the rainy season but the 'Melghat bandhara' model is working wonders

Indian gaurs in inviolate Kelpani and Dhargad feasting on palatable grass. A sloth bear can be seen in Gullarghat meadows








A few years ago, regular sighting of wild animals in the Melghat Tiger Reserve (MTR) used to be a joke but water conservation through the 'Melghat bandhara' model and voluntary relocation of 20 villages from the core area of the reserve have turned out to be game changers for one of the oldest tiger reserves in the country.

Along with many water conservation steps, voluntary relocation of 20 villages from the core area have helped regain over 1,700 hectares of farm land which have turned into lush green meadows now. If you enter through the rehabilitated Gullarghat, 35km of the stretch till Nagartas is a no-man's-land with meadows on both sides.

As far as water conservation is concerned, the tiger reserve forms an important catchment to Tapi river with tributaries like Dolar, Khandu, Sipna, Gadga, Khapra and Wan rivers. Yet, water is the most prevalent limiting factor after the rainy season but the 'Melghat bandhara' model implemented in last three years is working wonders.

**TODAY'S SPECIAL**

"We identified spots of hard rocks in natural streams and drilled them to develop layers of retaining walls to stop water upstream. Usually, water flows out and streams and nullahs used to go dry by January. Now, with Melghat bandharas, water is available for wildlife till May-June. Earlier, we supplied water by tankers at many places during summers, but in the last three years, we constructed over 2,000 such cost-effective diversion weirs in core and buffer area," said MS Reddy, APCCF & field director of MTR.

"Apart from rejuvenating old water holes, we dug 500 borewells at protection camps and forest colonies and installed over 170 solar pumps, each one connected to three artificial water holes. Our water conservation model is also useful for villagers living on the park's edge," added Reddy.

A water hole was created every 4sqkm grid of the park. The tiger reserve is spread in 2,768 sqkm (core & buffer) and wildlife and water management is a big challenge, especially when there are still 9 villages inside the core area.

"We plotted the 4sqkm grid by GIS. The basic idea behind water availability at every 4sqkm is equitable distribution of water. While large mammals can move long for water, it fulfils the drinking water need of the localized small mammals," says Vishal Bansod, honorary wildlife warden.

"Small interventions like building one-metre circular bandharas (check dams) on Wan River and other streams have proved beneficial. At many places, grass grows in stagnant water which also acts as fodder for herbivores like sambar deer," says RFO Sunil Wakode, Dhargad.

> **SMALL INTERVENTIONS LIKE BUILDING ONE-METRE CIRCULAR BANDHARAS ON WAN RIVER AND OTHER STREAMS HAVE PROVED BENEFICIAL.** AT MANY PLACES, GRASS GROWS IN STAGNANT WATER WHICH ALSO ACTS AS FODDER FOR HERBIVORES LIKE SAMBAR DEER
>
> **SUNIL WAKODE** | RFO, DHARGAD

In MTR, water management has been handled effectively and voluntary relocation of villages is the biggest game changer. Since 2001-2020, 20 villages have been relocated and 4 villages are in the process of being shifted.

"Tiger sighting is no more kidding but a reality. Sightings have increased, especially around the meadows which have been created after resettlement. Melghat is coming out steadily by overcoming challenges," says Satpuda Foundation founder Kishor Rithe.

TOI spotted three big herds of Indian gaurs in inviolate Kelpani and Dhargad feasting on palatable grass available in abundance in meadows. A sloth bear was also a pleasant surprise. A 4-km-long trail of tiger pugmarks from Somthana to Barukheda spoke volumes about the regained lost habitat after voluntary relocation.

"We have many problems like vacancies in field staff, encroachments on forest lands, illegal grazing etc. But our officers and field staff are working hard on the ground. The success also goes to my predecessors who built a strong protection network," said Reddy.



23

# Nature art

**Satish Ansignkar** Pune
**Atmaja Avirupa Das** West Bengal





















24

# Photography section

**Manish Mahajan**
**Manish Ghurde**



*Machaan*



*Bori meadow*



*Spotted deer*



*Sloth bear*

**Rahul Kalmegh**



*Plum headed parakeet*



*Indian pitta*



*Wild dog*

**Mayur Surwase,**
Range Forest Officer,
Dnyanganga Wildlife Sanctuary,
Melghat Tiger Reserve



*Baya weaver*



*Baya weaver*



*Chinkara*



*Chinkara*



*Tanay panpalia*

# Pandhrkawada Wildlife Division





















# Tourism Activities in Melghat Tiger Reserve

## Comfortable Stay & Food

- Semadoh
- Kolkas
- Shahanur
- Harisal
- Chikhaldara
- Home Stays

## British Treasured Rest Houses

- Dhakna
- Tarubanda
- Rangubeli
- Chaurakund
- Raipur
- Hatru

## Enjoy Thrilling Activities



Jungle Safari



Elephant Safari



Night Safari



Adventure Activities



Monsoon Trek



Kayaking

WILD MELGHAT e-Magazine



Indian monitor lizard
&
Rufous treepie


# Acknowledgement

**Melghat Tiger Reserve
is thankful to all photographers,
who sent us beautiful photographs
for publishing in Wild Melghat e-Magazine.**

- Ajay Deshmukh
- Ashish Tomar
- Ankit Bibekar
- Rakesh Mahalle
- Chhatrapal Choudhari
- Pandhrkawada Widlife Division
- Dr. Milind Shirbate
- Hiralal Choudhari
- Prafulla Sawarkar
- Sunil Wakode
- Sidharth Nagarkar
- Chandrkanat Zatale
- Shilpa Ghukase
- Paramanand Alokar
- Apeksha Tarjule
- Team WRCS
- Team Transit Treatment Center
- Dr. Archana Mahakalkar
- Melghat Wildlife Division

Leopard

WILD MELGHAT e-Magazine

The articles published in the **Wild Melghat e-Magazine** are the personal ideology of author. Donations to Melghat Tiger Conservation Foundation are eligible for 50% Income Tax Exemption under Section 80G of the Income Tax Act.

Name of the Account : **Melghat Tiger Conservation Foundation, Amravati**

Name of Bank & Branch : Indian Overseas Bank, Gandhi Chowk, Ambadevi Road, Amravati. (M.S.)

Account Number : **101701000019000**

IFSC Code : **IOBA0001017**

You are invited to explore the all new accommodation and restaurants at Semadoh, Narnala, Harisal, Aamzari & Kolkas. Melghat Team will ensure that you will have a great time.

Website: **www.magicalmelghat.com**

Please feel free to coordinate with

**Mr. Swapnil Bangde**

E-mail: **magicalmelghat@gmail.com**

Call him on **+91 89565 63016**

He will help you plan your program.




*Office of the*

**Additional Principal Chief Conservator of Forest & Field Director, Melghat Tiger Reserve, Amravati.**

**Near Govt. Girls High School, Camp Road, Amravati 444 602 (M.S.)**

*Phone No.:* **0721-2551766, 2662792** *Website:* **www.magicalmelghat.com**

*E-Mail:* **ccffdmelghat2@mahaforest.gov.in**